# ग्रामपंचायत चांदवड
# ता. चांदवड, जि. नाशिक

# ग्रामनिधी लेखापरीक्षण अहवाल

## सन २००५ – २००६
## ते
## २००७ – २००८

# ग्रामपंचायत :- चांदवड, तालुका :- चांदवड, जिल्हा :- नाशिक
# ग्रामनिधी लेखापरीक्षण अहवाल
# सन २००५ – २००६ ते २००७ – २००८

जा.क्र.एल ४ बी/१/ग्राम/लेखा/नाशिक

उपमुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा, नाशिक
लेखाकोष भवन, तिसरा मजला,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
नाशिक
दिनांक :-

प्रति,

मा. सरपंच,
ग्रामपंचायत : चांदवड
तालुका : चांदवड
जिल्हा : नाशिक

महोदय,

आपले ग्रामपंचायतीचे सन २००५ – २००६ ते २००७ – २००८ चे लेखापरीक्षण श्री. शे. गो. देवळे, जिल्हा ग्रामपंचायत लेखा परीक्षक, श्रेणी – २ यांनी श्री. भा. मा. सोनवणे, ग्रामपंचायत दुय्यम लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांच्या मदतीने महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे नियम १४०(१) अन्वये पंचायतीचे ग्रामविकास अधिकारी, श्री. एस. पी. उबाळे यांनी उपलब्ध केलेल्या दप्तरावरुन दिनांक २३.४.२००८ ते १७.६.२००८ या कालावधीत पूर्ण केले. त्यात निघालेले आक्षेप भाग – २ मध्ये दिलेले आहेत. त्याची पुर्तता पंचायतीने मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १४०(२) प्रमाणे तीन महिन्यात करावी.

| अ. क्र. | पदनाम | अ. क्र. | नाव | कालावधी | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | पासून | पर्यंत |
| १ | सरपंच | १ | श्री. जगन्नाथ निवृत्ती राऊत | ०१.०४.२००५ | २१.०८.२००५ |
| | | २ | श्री. सुनिल त्र्यंबक कबाडे | २२.०८.२००५ | ११.०९.२००७ |
| | | ३ | सौ. शांताबाई हिरामण शेळके | १२.०९.२००७ | १२.१२.२००७ |
| | | ४ | श्री. राजेंद्र ताराचंदजी डुंगरवाल | १३.१२.२००७ | ३१.०३.२००८ |
| २ | ग्रामविकास अधिकारी | १ | श्री. डी. एन. जगताप | ०१.०४.२००३ | ३०.१०.२००७ |
| | | २ | श्री. एस. पी. उबाळे | ०१.११.२००७ | ३१.०३.२००८ |

# भाग १ ला
# (मागील लेखा परीक्षण)

## महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखा परीक्षा १९६१ चे नियम १८(१)(२) प्रमाणे

पंचायतीचे मागील लेखापरीक्षण सन २००४ – २००५ अखेर झालेले आहे. त्याची पुर्तता पंचायतीने केलेली नाही. मात्र आजतागायत खाली दर्शविलेले परिच्छेद प्रलंबित असून त्याची पुर्तता करुन त्यावर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे नियम १४० (३)(४) नुसार योग्य ती कार्यवाही करावी व अंतिम निर्णय प्राप्त करुन दाखवावेत, तो पावेतो खालील सर्व परिच्छेद कायम समजण्यात येत आहेत.

| अ. क्र. | लेखापरीक्षण वर्ष | पुर्तता पात्र परिच्छेद | पुर्तता केलेले परिच्छेद | स्विकृत परिच्छेद | थकीत परिच्छेद |
|---|---|---|---|---|---|
| १ | ६२-६३ ते ६६-६७ | २ | - | - | २ |
| २ | ६७-६८ ते ६९-७० | ५ | - | - | ५ |
| ३ | ७०-७१ ते ७१-७२ | ३ | - | - | ३ |
| ४ | ७२-७३ ते ७३-७४ | १४ | - | - | १४ |
| ५ | ७४-७५ | ३ | - | - | ३ |
| ६ | ७५-७६ ते ७६-७७ | १२ | - | - | १२ |
| ७ | ७७-७८ | १६ | - | - | १६ |
| ८ | ७८-७९ | १८ | - | - | १८ |
| ९ | ७९-८० | २० | - | - | २० |
| १० | ८०-८१ ते ८२-८३ | ४० | - | - | ४० |
| ११ | ८३-८४ ते ८४-८५ | ५१ | - | - | ५१ |
| १२ | ८५-८६ | ६७ | - | - | ६७ |
| १३ | ८६-८७ ते ८९-९० | ८० | - | - | ८० |
| १४ | ९०-९१ | ३५ | - | - | ३५ |
| १५ | ९१-९२ | २९ | - | - | २९ |
| १६ | ९२-९३ ते ९३-९४ | ५० | - | - | ५० |
| १७ | ९४-९५ ते ९८-९९ | ५० | - | - | ५० |
| १८ | ९९-२००० ते ०२-०३ | ४२ | - | - | ४२ |
| १९ | ०३-०४ | ३७ | - | - | ३७ |
| २० | ०४-०५ | ३३ | - | - | ३३ |

# भाग २ रा
# (चालु लेखा परीक्षण)

## महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखा परीक्षा १९६१ चे नियम १६ प्रमाणे

तपासणीचे दिवशी दिनांक २८.४.२००८ रोजी शिल्लका व को-या पावती पुस्तकांचा साठा पाहिला असता तो खालीलप्रमाणे आढळून आला.

अ) रोकडवही नमुना नंबर ५ नुसार शिल्लका :-

| अ. क्र. | तपशिल | ग्रामनिधी | ग्राम पाणी पुरवठा | दलित वस्ती सुधार योजना |
|---|---|---|---|---|
| १ | बँकेत एन. डी. सी. | २,९५,१४०.७४ | ८८,१२१.०० | ७,०००.०० |
| २ | बँकेत स्टेट बँक | १,०८४.०० | | |
| ३ | पोष्टात | ४४७.१० | | |
| ४ | ग्रामसेवक हाती रोख | ४.०० | | |
| | **एकूण** | **२,९६,६७५.८४** | **८८,१२१.००** | **७,०००.००** |

ब) नमुना नंबर १७ नुसार पोष्टाची शिल्लक तिकीटे :-

क) साठा नोंदवही नमुना नंबर १८ नुसार शिल्लक कोरी पावती पुस्तके

१. नमुना नंबर ७ ची कोरी पावती पुस्तके :- अपूर्ण

२. नमुना नंबर १० ची कोरी पावती पुस्तके :- अपूर्ण

३. कोंडवाडा अ ची कोरी पावती पुस्तके :- अपूर्ण

४. कोंडवाडा ब ची कोरी पावती पुस्तके :- अपूर्ण

५. आठवडे बाजार :- अपूर्ण

# महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखा परीक्षा १९६१ चे नियम १८(२)(ब) प्रमाणे

---

**परिच्छेद क्रमांक :- २ :- आर्थिक स्थिती**

लेखापरीक्षणासाठी सादर केलेल्या दप्तरावरुन दिनांक ३१.३.२००८ रोजीची ग्रामनिधीच्या आर्थिक स्थितीचे विवरणपत्र :-

| अ. क्र. | दायित्व | रुपये | अ. क्र. | मत्ता | रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | जि.ग्रा.वि.निधी | २०९४६ | १ | ग्रामनिधी नमुना नंबर ५ नुसार | ४५३०९७.८४ |
| २ | १० टक्के महिला व बालकल्याण | ७५८८६ | २ | ग्रा. पा. पु. निधी नमुना नंबर ५ नुसार | ११२६२१.०० |
| ३ | २५ टक्के मागासवर्गीय सदरी | १७१८२१८ | ३ | नमुना नंबर ८, ९ | |
| ४ | ३५ टक्के शेतसारा अनुदानाचे पा. पु. कडे वर्ग | २३७५३ | ४ | गाळे भाडे थकबाकी (परि पहा) | १२००००.०० |
| ५ | दलित वस्ती स्वामित्व धन | ३९००४ | ५ | आठवडे व दैनिक बाजार लिलाव थकबाकी | १११०८५६.०० |
| ६ | दलित वस्ती विक्रीकर | ७१७०० | ६ | पाणी पट्टी थकबाकी | २५९२७५५.०० |
| ७ | अनामत<br>(परि २९ पहा)<br>(परि ७ पहा) | <br>४६०००<br>१३०००० | | | |
| ८ | शौचालय अनुदान अखर्चित | २४०००० | | | |
| ९ | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी हिस्सा | ४१३०० | | | |
| | **एकूण एकंदर** | **२४०६८०७** | | **एकूण एकंदर** | **४३८९३२९.८४** |

<u>तीन वर्षाच्या जमा व खर्चाची सरासरी आकडेवारी</u>

| अ.क्र. | सन | उत्पन्न | खर्च |
|---|---|---|---|
| १ | २००४ – २००५ | ३२,२६,२३९ | २,८७८,२२४ |
| २ | २००५ – २००६ | ३४,४८,३५९ | १९,२७,७५७ |
| ३ | २००६ – २००७ | ३५,४३,९३१ | ४३,६८,७०३ |
| | **एकूण रक्कम** | **१,०२,१८,५२०** | **९१,७४,६८४** |
| | **सरासरी रक्कम** | **३४,०६,१७३** | **३०,५८,२२८** |

वरीलप्रमाणे आर्थिक स्थितीचे विवरणपत्र पहाता दायित्त्वाचे मत्तेवर अधिक्य दिसून येते. तसेच सरासरी जमेपेक्षा खर्च कमी दिसून येतो. यावरुन पंचायतीची आर्थिक स्थिती असमाधानकारक दिसून येते.

पंचायतीने यापुढे विहीत नियम व अधिनियम यांच्या अधिन राहून पंचायतीचे उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करावा. तसेच वेळोवेळी करांची नियमाप्रमाणे फेरआकारणी करुन १०० टक्के वसूली करुन थकबाकी राहणार नाही याची काळजी घ्यावी, पंचायतीने नवीन बांधकामासाठी परवानगी दिलेनंतर संबंधितांनी काम पूर्ण केले नंतरही कराची आकारणी सुधारीत दराने केलेली नाही. (पहा परिच्छेद क्रमांक ९) ह्या बाबत नव्याने नमुना क्रमांक ८ ची पुनर्रचना करुन आकारणी सुधारीत करुन उत्त्पन्नात निश्चित अशी भर घालावी.

उपरोक्त नमुद मत्ता व दायित्वाची पडताळणी केली असता दिनांक ३१.३.२००८ अखेर ग्रामनिधीत शिल्लक रुपये ४,५३,०९७/- एवढी असून तात्काळ देणे रुपये ५,६८,३०४/- (अ.क्र. ५ ते ९) असून सदरची रक्कम प्रदान करणेसाठी ग्रामपंचायतीकडे पुरेशी शिल्लक नसलेचे स्पष्ट होते. यावरुन ग्रामपंचायतीने लेखापरीक्षण वर्षात खर्च रक्कमेवर कोणतेही नियंत्रण ठेवलेले नसून प्राप्त उत्पन्नाचे अनुषंगाने खर्च केलेला नाही हे स्पष्ट होते.

पंचायतीने लेखापरीक्षण वर्षात आठवडे व दैनिक बाजार लिलाव व दुकान गाळे थकबाकी अनुक्रमे रुपये ११,१०,८५६/- व रुपये १,२०,०००/- वसूलीची कोणतेही ठोस कार्यवाही न केलेमुळे ग्रामपंचायतीची आर्थिक नियोजन पूर्णपणे ढासळलेले आहे.

ह्या प्राप्त परिस्थितीचा विचार करता पुढीलप्रमाणे ठोस कार्यवाही करुन पंचायतीच्या उत्पन्नात वाढ करणेबाबत परिणामकारक कार्यवाही करावी.

१. आकारणी सुधारीत दराने करुन परिच्छेद क्रमांक ९ मध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करावी.

२. पंचायतीकडे असलेली गाळे संदर्भात सुधारीत बांधकाम विभागाचे प्रमाणपत्र घेऊन भाडे आकारणी करावी.
३. खर्चात काटकसरीच्या उपाययोजना कराव्यात.
४. ग्रामपंचायतीने गावातील यात्रेतील पार्कींग किंवा यात्राकरातून उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करावा.
५. गावातील इमारतीचे भाड्याने दिलेल्या असल्यास कर आकारणी व्यावसायिक दराने करावी.
६. व्यावसायिकांना पाणी पट्टी दुप्पट दराने आकारणी करावी.
७. गावांतर्गत शैक्षणिक संस्थांना व कृषी उत्पन्न बाजार इमारत व जागांना कर आकारणी करण्यात यावी.
८. गावातील मोबाईल कंपनीच्या टॉवरर्सना आकारणी केलेली नाही. याबाबत खुलासा करुन मागील थकबाकीसह कर आकारणी करण्यात यावी.

---

## महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखा परीक्षा
## १९६१ चे नियम १७ (अ) प्रमाणे

---

**परिच्छेद क्रमांक :- ३ :- अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा जादा केलेल्या खर्चाबाबत.**

पंचायतीने मंजूर अंदाजपत्रक व त्यातील अर्थसंकल्पीय तरतुदीचा प्रत्यक्ष खर्चाशी मेळ घेता खालीलप्रमाणे मंजूर तरतुदीपेक्षा जादा व शिवाय खर्च केला आहे. मात्र सदरच्या खर्चास मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ६२(अ) नुसार पुरक अर्थसंकल्प अथवा ग्रामपंचायत अंदाजपत्रक व हिशोब नियम १९५८ चे नियम ४ (१)(२) नुसार पुनर्विनियोजन विविरणपत्र तयार करुन त्यास पंचायत समितीची वेळीच मंजूरी घेतलेली नाही. त्या अभावी सदरचा लेखा परीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. आता सदर झालेल्या खर्चास सक्षम अधिका-याची मान्यता घ्यावी.

| सन | खर्च बाब | प्रत्यक्ष खर्च | मंजूर तरतूद | जादा खर्च |
|---|---|---|---|---|
| सन २००५ – २००६ ते २००७ – २००८ मंजूर अंदाजपत्रक व पुरवणी अंदाजपत्रक लेखापरीक्षणास प्राप्त झालेले नाही ते प्राप्त करुन जादा खर्चाबाबत उपरोक्त नमुद नियमानुसार पुर्तता करावीत. | | | | |

---

**<u>परिच्छेद क्रमांक :- ४ :- स्ट्रीट लाईट दुरुस्ती व देखभाल खर्चाबाबत.</u>**

अ) ग्रामपंचायत हद्दीमधील स्ट्रीट लाईट दुरुस्ती व देखभालीसाठी पंचायतीने दिनांक २२.७.२००४ रोजी दैनिक देशदुत या वृत्तपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविल्या. मुदतीत ९ निविदा प्राप्त झाल्यात. सर्वात कमी निविदा दर मे. जय मातादी इलेक्ट्रीकल्स् चांदवड यांची रुपये ६,७६,८००/- ची निविदा दिनांक १.८.२००४ ते ३१.७.२००७ ह्या मुदतीची मंजूर केलेली आहे.

दिनांक १.८.२००४ ते ३१.७.२००७ ह्या मुदतीत केलेल्या करारनाम्याप्रमाणे प्रती महा रुपये १६,७१७/- प्रमाणे ३६ महिने मुदतीचे केला असून मंजूर निविदा रक्कमेच्या (रुपये ६,७६,८००/-) रुपये ७५,०००/- अग्रीम रक्कम देणेत आली असून ह्या कराराच्या मुदतीपर्यंत संबंधित मक्तेदारास खालीलप्रमाणे रक्कमा प्रदान झाल्या आहे.

| | | |
|---|---|---|
| १. दिनांक १.८.२००४ ते ३१.३.२००५ | ८ महिने | रुपये २,१४,७२४/- |
| २. दिनांक १.४.२००५ ते ३१.३.२००६ | १२ महिने | रुपये २,२५,१२०/- |
| ३. दिनांक १.४.२००६ ते ३१.३.२००७ | १२ महिने | रुपये १,८३,१२०/- |
| ४. दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८ | ४ महिने | रुपये ५२,४३६/- |
| | | **एकूण रुपये ६,७५,४००/-** |

१. ह्या करारादरम्यान संबंधितांस रुपये ६,७५,४००/- रक्कम प्रदान झाली असून मागील लेखापरीक्षण अहवाल सन २००४ – २००५ मधील परिच्छेद क्रमांक २६ नुसार संबंधित मक्तेदारास रुपये १,०६,०००/- अग्रीम दिला असून त्या रक्कमेचे समायोजन होणे बाकी असल्याबाबत परिच्छेदांत नमुद केले आहे.

२. उपरोक्त नमुद प्रदान रक्कम रुपये ६,७५,४००/- व अग्रीम प्रदान रक्कम रुपये १,०६,०००/- असे एकूण रुपये ७,८१,४००/- प्रदान झालेले दिसून येते. अग्रीम रक्कमेचे समायोजन करुन करारनाम्यानुसार रक्कम रुपये ६,७६,८००/- च्या रक्कमेचा मेळ घेऊन जादा रक्कम ग्रामनिधीत जमा करावीत.

३. ग्रामपंचायतीने सदरची योजना दिनांक १.८.२००४ पासून सुरु केली अशाप्रकारचा मक्ता देणेची तरतुद नगरपालिका अधिनियमांत आहेत. तथापि ग्रामपंचायत अधिनियमात अशी तरतुद नसल्याने अशा प्रकारची केलेली कार्यवाही अनियमित आहे. ह्या बाबत शासनाची मान्यता मिळणेसाठी जिल्हा परिषदेमार्फत प्रस्ताव पाठवून पुढील अंमलबजावणी करावी.

४. सदरची योजना राबविणेपूर्वी पथदिपांचे देखभाल व दुरुस्तीसाठी मागील तीन वर्षाचा खर्च विचारात घेऊन दिलेला मक्ता रुपये ६,७८,०००/- हा वाजवी व

ग्रामपंचायतीस आर्थिक दृष्टया हितकारक होता ह्याबाबत कागदपत्रासह योग्य ती खात्री पटवावी.

ब) उपरोक्त नमुद अ नुसार पथदिप देखभालीची मुदत संपलेनंतर दिनांक १.१०.२००७ ते ३१.९.२०१० पर्यंतच्या कालावधीसाठी निविदा मागविण्यात आल्यात. त्यानुसार ६ निविदा प्राप्त झाल्या. त्यांपैकी सर्वात कमी दराची निविदा रु. ५,७०,०००/- ची पंकज इलेक्ट्रीकल्स यांची होती.

तथापि ग्रामपंचायतीने ठराव क्रमांक ५६ दिनांक २९.९.२००७ अन्वये मे. जय मातादी इलेक्ट्रीकल्स, चांदवड यांची रक्कम रुपये ५,६८,०००/- ची निविदा दिनांक १.१०.२००७ ते ३१.९.२०१० ह्या कालावधीसाठी मंजूर केली आहे. प्रत्यक्षात जय मातादी इलेक्ट्रीकल्स यांची निविदा दप्तरी पडताळणीसाठी पहावयास मिळाली नाही. त्यामुळे प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा पंकज इलेक्ट्रीकल्स यांचे दर रक्कम रुपये ५,७०,०००/- पेक्षा जय मातादी यांचे दर कमी असल्याची खात्री करता आली नाही.

तसेच जय मातादी इलेक्ट्रीकल्स, चांदवड यांना कार्यालयाचे आदेश क्रमांक ३४८ दिनांक ३०.९.२००७ अन्वये कामाचे आदेश देण्यात येऊन रुपये १००/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा करणेबाबत सूचित केले त्यानुसार ग्रामपंचायतीने केलेला करारनामा दप्तरी नाही. तथापि संबंधित मक्तेदाराकडून झालेल्या करारनाम्याच्या प्रतीची मागणी केली असता संबंधितांनी करारनाम्याची छायांकीत प्रत सादर केली. ह्या प्रतीवर करारनामा शर्त अट क्रमांक ४ (अ) व (ब) मध्ये रुपये ६,९२,०००/- रक्कमेच्या पोटी रुपये ८०,०००/- अग्रीम व उर्वरित रक्कम तीन वर्षात दरमहा रुपये १७,०००/- समान हप्त्यात (३६ हप्ते) देणेत येईल असे नोंदवले आहे. ह्या करारनाम्यावर तात्कालीन ग्रामविकास अधिकारी व सरपंच ह्यांच्या स्वाक्ष-या आहे.

प्रत्यक्ष झालेला ठराव क्रमांक ५६ नुसार रुपये ५,६८,०००/- रक्कमेबाबत रुपये ८०,०००/- अग्रिम रक्कम व उर्वरित ३६ हप्ते दरमहा रुपये १३,५५६/- प्रमाणे करार करणे आवश्यक होते. तथापि ग्रामपंचायतीने केलेल्या ठरावाचे अगदी विरुध्द जादा रक्कमेचा करार करुन संगनमताने जादा प्रदान रक्कमेचा अपहार करावयाचा प्रयत्न होत आहे. ह्याबाबत प्रशासकीय चौकशी होऊन सन २००७ – २००८ ह्या आर्थिक वर्षात खालीलप्रमाणे जादा प्रदान रक्कम सव्याज वसूल करावी व पुढील दोन वर्षात वेळोवेळी जादा प्रदान होणारी रक्कम तात्काळ थांबवणेत येऊन मंजूर केलेल्या ठरावाचे अनुषंगाने अंमलबजावणी केल्याबाबत खात्री पटवावी.

| दिनांक | प्रदान केलेली रक्कम रुपये | करावयाची रक्कम रुपये | जादा प्रदान |
|---|---|---|---|
| ०३.०१.२००८ | १७,००० | १३,५५६ | ३,४४४ |
| ०७.०१.२००८ | १७,००० | १३,५५६ | ३,४४४ |
| ०६.०२.२००८ | १७,००० | १३,५५६ | ३,४४४ |

| | | | |
|---|---|---|---|
| २१.०२.२००८ | २०,००० | - | - |
| १९.०३.२००८ | १७,००० | १३,५५६ | ३,४४४ |
| **एकूण** | ८८,००० | | १३,७७६ |

उपरोक्त अभिप्रायांची पूर्तता होऊन त्याप्रमाणे कार्यवाही झाल्याबाबत खात्री पटवावी.

---

## महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखा परीक्षा
## १९६१ चे नियम १७ (ब) प्रमाणे

---

**परिच्छेद क्रमांक :- ५ :- हिशोबी नमुन्यांबाबत –**

ग्रामपंचायत अंदाजपत्रकात व हिशोब नियम १९५९ मधील ५(१) कलमानुसार खालील नमुन्यांबाबत पंचायतीने कार्यवाही करुन दाखवावी.

१. शासन आदेश क्र. आर. डी. डी. / व्ही. क्र. २४२२/सी.आर./६/XIII/९ दिनांक ३१.३.१९८० अन्वये पावती पुस्तके मा. गटविकास अधिकारी यांचेकडून प्रमाणित करुन घेतलेले नाहीत.

२. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ५७ अन्वये साप्ताहिक जमा खर्चाचे विवरण सरपंच तसेच गटविकास अधिकारी यांना दिले जात नाही.

३. नमुना नंबर ५ रोकडवहीत रोजच्या व्यवहारावर मा. सरपंच यांच्या सह्या नाहीत. तसेच मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ५७ अन्वये साप्ताहिक जमा खर्चाचे विवरण सरपंच तसेच गटविकास अधिकारी यांना दिले जात नाही.

४. वसूलीची पावती पुस्तके वापरणेपूर्वी शासन आदेश क्र. व्ही.पी.टी./२४ - २२/१८.८.८५/सी.आर./६३३/पी. दिनांक ३१.३.१९८० नुसार पंचायत समितीकडून सिल व नोंद करुन घेतल्या जात नाहीत.

५. नमुना नंबर १५ व २२ मधील संपूर्ण रकाने भरले जात नसून कामावर लावलेल्या मजूरांचे अंगठे साक्षांकित / दस्तूर करुन घेतले जात नाहीत.

६. नमुना नंबर १९, जडसंग्रह नोंदवहीचा दरवर्षी वर्ष अखेरीस वस्तू बरोबर असल्याबाबत मा. सरपंच यांचे दाखले घेतलेले नाहीत व मागील नोंदवहीप्रमाणे सर्व साहित्याच्या नोंदी घेतलेल्या नाहीत.

७. नमुना नंबर १८ मधील साहित्य वापरासाठी ज्यांचे ताब्यात दिले त्या संबंधितांच्या सह्या घेतलेल्या नाहीत.

८. नमुना नंबर १६,१७,२३,२५ ते २७ सदरचे नमुन्यांचा वापर केला जात नाही. तरी सदरचे नमुने आवश्यकतेनुसार वापरावेत. तसेच सदरचे गाव राष्ट्रीय महामार्गाला लागून असलेमुळे ह्या क्षेत्रातील मोकळ्या जागा व्यावसायिक कारणासाठी खाजगी उपयोगात येण्याची शक्यता असलेमुळे नोंदी अद्यावत नोंदवून प्रमाणित करणेत याव्यात.

९. मासिक सभा इतिवृत्त वही - लेखा परीक्षा मुदतीची मासिक सभा इतिवृत्ते वहीचे अवलोकन केले असता खर्चोत्तर मंजूरी घेतली जाते परंतु कोणत्याही खर्चापूर्वी मासिक सभेत आगाऊ व तपशिलवार मंजूरी घेणेत येत नाही.

१०. ग्रामपंचायत अधिनियमानुसार नमुना नंबर १ ते २८ मधील सर्व नमुने विहीत पध्दतीनुसार अद्यावत ठेवण्यात यावेत.

---

## परिच्छेद क्रमांक :- ६ :- किरकोळ रक्कमा येणेबाकीबाबत.

नमुना नंबर ११ किरकोळ मागणी नोंदवहीनुसार तसेच या अहवालासोबत जोडलेल्या विवरणपत्राप्रमाणे किरकोळ रक्कम रुपये ११,१०,८५६/- वसूल होणे बाकी आहे. ग्रामपंचायत कर व फी वसूलीचे नियम १९६० चे नियम ३ ते ५ नुसार त्या त्या वर्षात वसूलीची कार्यवाही पंचायतीने न केल्यामुळे पंचायतीचे आर्थिक नुकसान झालेले आहे. आता सदर रक्कमा व्याज नुकसानीसह कायदेशीर मार्गाने वसूल करुन जमा कराव्यात. वसूलीची कार्यवाही वेळीच का करणेत आलेली नाही याचा साधार खुलासा करावा. रक्कम वसूल न झाल्यास व रक्कम मुदतबाह्य ठरल्यास सदर रक्कमेची जबाबदारी संबंधित पदाधिका-यांवर राहील याची नोंद घ्यावी.

---

## परिच्छेद क्रमांक :- ७ :- अनामत रक्कमांबाबत

पंचायतीने खालील नमुद तपशिलाप्रमाणे रोखवहीत अनामत रक्कमा जमा केलेल्या आहेत.

| सामान्य पावती क्र. | दिनांक | रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|---|
| ३५ | २०.७.२००६ | १,००,००० | श्री. डी. एन. जगताप, ग्रामविकास अधिकारी |
| ३९ | २७.७.२००६ | ६०,००० | श्री. हर्षवर्धन बाबुलाल गुजराथी |
| ४९ | १४.९.२००६ | ५,००० | श्री. रमणलाल चंदमल लोढा |

ह्या प्राप्त केलेल्या अनामत रक्कमांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.

१. सामान्य पावती क्रमांक ३५ दिनांक २०.७.२००६ अन्वये रुपये १,००,०००/- तात्कालीन ग्रामविकास अधिकारी श्री. डी. एन. जगताप यांनी रोख स्वरुपात अनामत पंचायतीस दिलेली आहे व सदरची अनामत रक्कम जमा तारखेच्या दिवशी बँक खाते मध्ये जमाही झालेली आहे.

ग्रामविकास अधिकारी या पदावर असलेल्या कर्मचा-याने एवढी मोठी रक्कम अनामत म्हणून ग्रामपंचायतीस देतांना खाजगी स्वरुपात काय व्यवहाराबाबत हालचाली केल्यात किंवा ह्या रक्कमेच्या संदर्भात नमुना नंबर १६ (आयकर विवरण) प्राप्त करुन त्यांचे उत्पन्नातून अनामत देण्याची आर्थिक क्षमता आहे किंवा कसे ह्याची खात्री पटवावी व ह्या व्यवहाराबाबत प्रशासकीय चौकशी होऊनच रक्कम संबंधितांना प्रदान करणे संदर्भात कार्यवाही करावी व केलेली कार्यवाहीबाबत योग्य ती कागदपत्रे प्रदान रक्कमेच्या प्रमाणकांसंदर्भात जतन करावी.

२. श्री. हर्षवर्धन बाबुलाल गुजराथी यांनी सामान्य पावती क्रमांक ३९ दिनांक २७.७.२००६ अन्वये रक्कम रुपये ६०,००/- अनामत पंचायतीस दिलेली आहे. ह्या रक्कमेपोटी ग्रामनिधीत खालील नमुद तारखांना संबंधितांना रक्कमा प्रदान केल्याचे आढळून आले ह्याबाबत योग्य ती खात्री पटवून स्वाक्षरी प्राप्त केल्याचे दाखवावे.

| प्रमाणक क्रमांक | रक्कम रुपये | दिनांक |
|---|---:|---|
| ३०६ | २५,००० | ०६.३.२००७ |
| ७७ | १०,००० | १३.६.२००७ |
| एकूण | ३५,००० | |
| (६०,००० – ३५,०००) = २५,००० देणे बाकी | | |

३. ग्रामपंचायतीने ग्रामीण पाणी पुरवठा निधीत प्रमाणक क्रमांक ४३ दिनांक ६.११.२००६ रुपये २५,०००/- प्रसाद गुजराथी यांना अनामत परत केलेली आहे. ग्रामपंचायतीने सदर अनामत ग्रामनिधीत जमा केलेले आहे असे लेखापरीक्षणात कळविण्यात आले आहे. पण अनामत रक्कम ज्या निधीत जमा आहे त्याच निधीतून परत करणे आवश्यक होते. वरील अनियमिततेबाबत खुलासा करुन अनामत परतावा योग्य झाल्याची खात्री पटवावी.

---

**परिच्छेद क्रमांक :- ८ :- तरटेवाडा पाडणेसाठी झालेल्या खर्चाबाबत.**

प्रमाणक क्रमांक १२२ दिनांक २१.८.२००६ अन्वये श्री. डुंगरवाल यांना तरटेवाडा मोडकळीस आल्यामुळे जमीनदोस्त करणेबाबत जे.सी.बी. भाडे रक्कम रुपये ४५,५१२/- चे प्रदान केलेले आहे.

ह्यासंदर्भात कागदपत्रांची पडताळणी केली असता चांदवड गावातील जूना तरटेवाडा पावसामुळे मोडकळीस आलेमुळे जनतेच्या सुरक्षिततेकरता म. तहसिलदार व गटविकास अधिकारी यांचे आदेशानुसार पाडण्याची कार्यवाही करण्यांत आली.

वाडा पाडणेसाठी झालेल्या खर्चाचे अनुषंगाने ग्रामपंचायतीने सामान्य पावती क्रमांक ४६ दिनांक २१.८.२००६ रोजी श्री. किरण गोपाळ तरटे यांचेकडून वाडा पाडणेची रक्कम रुपये ४५,५१२/- वसूल करुन ग्रामनिधीत जमा केली.

तथापि धनादेश क्रमांक ८४५४०१ दिनांक ५.११.२००७ अन्वये रक्कम रुपये ३३,५००/- श्री. हेमंत वासूदेव तरटे ह्यांना रक्कम प्रदान केली. ह्यासंदर्भात परिच्छेद क्रमांक **३५** विस्तृत नोंदवला आहे.

१. वाडा पाडणेसाठी झालेला खर्च रुपये ४५,५१२/- श्री. किरण गोपाळ तरटे ह्यांचेकडून वसूली केला व धनादेशाद्वारे रक्कम रुपये ३३,५००/- श्री. हेमंत वासूदेव तरटे ह्यांना परत केली ह्या परस्पर विरोधी बार्बीबाबत प्रशासकीय चौकशी व्हावी व रक्कम परत करण्याचे प्रयोजनाबाबत संबंधितांकडून खुलासा योग्य त्या स्पष्टीकरणासह प्राप्त करुन रक्कम वसूल करावी.

२. सदरचा वाडा पाडलेनंतर ह्या वाड्यातून निघालेले लाकडे, दरवाजे इत्यादी साहित्याचा विनियोग काय केला अथवा निघालेले साहित्य वाड्याचे मालक वारसदार ह्यांना ताब्यात दिल्याबाबत योग्य त्या कागदपत्रासह खात्री पटवावी.

उपरोक्त अभिप्रायांची पूर्तता करुन योग्य ती खात्री व झालेला व्यवहार योग्य असलेबाबत सत्यता पडताळावी.

---

**परिच्छेद क्रमांक :- ९ :- बांधकाम पूर्व परवानगी दिल्यानंतर व बँकेने मिळकतीवर तारणपोटी बोजा चढवल्यानंतरही घरपट्टी आकारणी केलेली नाही.**

१. लेखापरीक्षण वर्षात ज्या नागरीकांना घराचे बांधकाम करावयाचे आहे त्यांनी प्रत्येकी रुपये २,०००/- ग्रामपंचायतीकडे भरणा करुन बांधकामास मंजूरी घेतलेली आहे. ह्याबाबत संबंधितांचे काम पूर्ण झालेनंतर घरपट्टी आकारणी केली किंवा कसे ह्याची पडताळणी नमुना क्रमांक ८ ची केली असता खालील नमुद तपशिलातील घरांचे नोंदी

समोर शेरा रकान्यात कर्ज घेतलेल्या बँकेचा बोजा नोंदवलेला आढळून आला. (उदाहरणादाखल)

| अ. क्र. | घरमालकाचे नाव | मिळकत क्रमांक | क्षेत्रफळ | बँकेचे तारण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | जानकाबाई झिप्रु ढोंबरे (सा.पा.क्र. १४९८/२४.३.२००६) | ७७० | ५४० | चांदवड मर्चंट बँक कर्ज रु. ३,००,०००/- दिनांक १.४.२००६ |
| २ | सुनिल गणपत कोकणे (सा.पा.क्र.४३ / २५.९.२००६) | ९१५ | - | चांदवड मर्चंट बँक कर्ज रु.१०,००,०००/- दिनांक १४.११.२००६ |
| ३ | बन्सीलाल छबीलदास लालवाणी (सा.पा.क्र. ७३ / ४.१.२००७) | ९१६ | - | चांदवड मर्चंट बँक कर्ज रु. १०,००,०००/- |
| ४ | रामदास यशवंत पंडीत (सा.पा.क्र. ५२ / २५.९.२००६) | ९१८ | - | चांदवड मर्चंट बँक कर्ज रु. ७,००,०००/- |
| ५ | अशोक रामचंद्र वायकोळे (सा.पा.क्र. ५६ / १२.१०.२००६) | ६१५/२ | - | व्यंकटेश पतपेढी रुपये ४ लाख |
| ६ | काशिबाई वसंतराव शेजवळ (सा.पा.क्र. ५० / १५.९.२००६) | ४०७/१.२ | - | चांदवड मर्चंट बँक कर्ज रु. १२,००,०००/- |

उपरोक्त नमुद मिळकत धारकांनी त्यांचे नावाखाली दिलेल्या पावती क्रमांकाने बांधकाम करणेसाठी परवानगी भरली आहे व ह्याबाबत नमुना क्रमांक ८ मध्ये नोंदीची पडताळणी केली असता ज्या वित्तीय संस्थेकडून मिळकत धारकाने कर्ज घेतले आहे, त्यांचे गहाणखत शेरा रकान्यात नोंदवलेले आहे.

कर्ज देणा-या वित्तीय संस्था घराचे पूर्ण काम झालेशिवाय अंतिम हप्ता वितरीत करता नाही व काम पूर्ण झालेनंतर सदरची मिळकत गहाण खत करुन आपलेकडे ठेवत असते व त्यानुसार उपरोक्त नमुद मिळकत धारकांवर पंचायतीने आकारणी लेखापरीक्षण मुदतीपर्यंत केलेली नाही. ह्याचप्रमाणे असंख्य मिळकत धारकांचे कामे पूर्ण होऊनही घरपट्टी आकारणी न केल्याने ग्रामपंचायतीचे फार मोठ्या प्रमाणार आर्थिक नुकसान झालेले आहे ह्याबाबत प्रशासकीय चौकशी होऊन नव्याने बांधकाम झालेल्या इमारतींवर आकारणी करुन पूर्वलक्षी प्रभावाने रक्कमा वसूल करण्यांत याव्यात.

२. तसेच व्यंकटेश सहकारी पतपेढी, सोमवार पेठ व आदर्श नागरी सहकारी पतपेढी अनुक्रमे मिळकत ७२३ ( १ ते ३ ) व ७३० ह्यांनी दिनांक २१.२.२००७ व २१.१.२००६ रोजी बांधकाम परवाना फी रुपये २,०००/- प्रत्येकी भरणा केली आहे. तथापि लेखापरीक्षण मुदतीपर्यंत ह्या मिळकतीवर आकारणी केलेली नाही. ह्याबाबत

चौकशी करता सदरचे काम पूर्ण नसल्याचे सांगाण्यात आले. बांधकाम परवानगीची मुदत किती होती ह्याबाबत कागदपत्रांअभावी पडताळणी करता आली नाही. ह्याबाबत बांधकाम परवानगी देतांना कामाची पूर्ण करणेसंदर्भात मुदत द्यावी व त्या मुदतीनंतरही काम पूर्ण न केल्यास पुनश्च फी ची आकारणी करण्यांत यावी.

३. ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात नाशिक मराठा विद्या प्रसारक संस्थेची सांस्कृतिक इमारत असून ह्या मिळकतीवर व नेपीचंद संस्थेचे निवासी (विद्यार्थी वसतिगृह) इमारतीवर आकारणी केलेली नाही. ती सुधारीत दराने पूर्वलक्षी प्रभावाने करणेत यावी.

४. पंचायत समितीच्या क्षेत्रातील निवासस्थानांवरही करांची आकारणी केली नसून त्या मिळकतीवर व अशा स्वरुपांच्या गावातील सार्वजनिक इमारतींवर कराची आकारणी करावी.

---

**<u>परिच्छेद क्रमांक :- १० :- ग्रामपंचायत कर्मचारी भविष्य निर्वाह निधी वर्गणीबाबत.</u>**

लेखापरीक्षण वर्षात नमुना क्रमांक २४ वेतन नोंदवहीची पडताळणी केली असता, कर्मचा-यांच्या वेतनातून भविष्य निर्वाह निधी वर्गणी हिस्सा कपात केला असून, कपात केलेली रक्कम व ग्रामपंचायत हिस्सा रक्कमेसह भरणा त्यांचे खाते क्रमांकावर भरलेली नाही.

सोबतच्या परिशिष्ट क्रमांक १ मध्ये नमुद भविष्य निर्वाह निधी वर्गणी, पंचायतीच्या हिस्सासह रक्कम रुपये ४१,३००/- (मार्च २००८ अखेर) भरणा करावीत. तसेच लेखापरीक्षण मुदतीत पर्यंत व अद्यावत महिन्यापर्यंतचा भरणा करुन ह्यापूढे वेळच्या वेळी रक्कमा भरणा करणेची दक्षता घ्यावी.

---

**<u>परिच्छेद क्रमांक :- ११ :- सहकारी गृहनिर्माण संस्थेची मोकळी जागा सार्वजनिक वापराबाबत.</u>**

लेखापरीक्षणात ग्रामपंचायतीने सहकारी गृहनिर्माण संस्थेची मोकळी जागा राखीव ठेऊन तिचा वापर सार्वजनिक व्हावा यासाठी ग्रामपंचायतीने सदर जागेवर मालकी हक्काबाबत योग्य ती कार्यवाही व्हावी व पुढील लेखापरीक्षणात दाखवावी.

---

**परिच्छेद क्रमांक :- १२ :- गावातील अतिक्रमणाबाबत.**

लेखापरीक्षणात ग्रामपंचायतीने गावातील अतिक्रमणाबाबत कोणती कार्यवाही केलेली आहे याबाबत लेखापरीक्षणात माहिती उपलब्ध झालेली नाही. तरी योग्य ती कार्यवाही करुन पुढील लेखापरीक्षणात दाखवावी.

---

**परिच्छेद क्रमांक :- १३ :- रोखवहीत प्रमाणकांशिवाय खर्च नोंदवलाबाबत.**

लेखापरीक्षण वर्ष सन २००५ – २००६ ते २००७ – २००८ ह्या कालावधीतील ग्रामनिधी व पाणी पुरवठा विभागाकडील रोखवहीत सोबतच्या परिशिष्ठ क्रमांक २ मध्ये नमुद खर्च मोघम स्वरुपात खर्ची नोंदवला आहे.

ह्या खर्चासंदर्भात संबंधितांकडे वारंवार तोंडी सूचना व अर्धसमास पत्र क्रमांक ३ दिनांक १७.६.२००८ रोजी लेखी मागणी करुनही उपलब्ध केलेली नाही. ह्या संदर्भात संबंधीत ग्रामविकास अधिकारी यांनी लेखापरीक्षण मुदतीनंतर सोबतचे नमुद प्रमाणके उपलब्ध केली व ती पडताळली. ह्या पडताळणीसाठी सादर केलेली प्रमाणके बरोबर व योग्य असल्याबाबत ग्रामपंचायतीने योग्य ती खात्री पटवावी.

सोबतच्या परिशिष्टात नमुद ग्रामनिधी व पाणी पुरवठा लेख्यातील प्रमाणकाशिवाय जोडलेला खर्च अनुक्रमे रुपये १०,३६,६५१/- व रुपये /- चा असून ह्यासंदर्भात प्राप्त साहित्य अथवा खर्च रक्कमेसंदर्भातील आवश्यक नस्ती व कागदपत्राअभावी खर्चाची अचूकता पडताळता आली नाही मोघम व निनावी खर्च नोंदवून संबंधितांनी रक्कमेचा अपहार केला असल्याची शक्यता आहे ह्या अनियमिततेबाबत प्रशासकीय चौकशी होऊन उपरोक्त नमुद रक्कमेचे खर्चासंदर्भात योग्य व अचूक प्रमाणके उपलब्ध करुन, खर्च योग्य झालेबाबत खात्री पटवावी अन्यथा उपरोक्त नमुद खर्च रक्कमा संबंधितांकडून सव्याज वसूल करुन त्या त्या निधीत जमा करुन, संबंधितांवर प्रशासकीय कार्यवाही करावी व ह्या संदर्भातचा अहवाल ह्या कार्यालयाकडे पाठवावा.

ग्रामनिधी – १०,३६,६५१/-
पाणी पुरवठा – /-

---

**परिच्छेद क्रमांक :- १४ :- चांदवड ग्रामपंचायतीजवळील ४ गाळे थकबाकीबाबत**

चांदवड ग्रामपंचायती जवळील ४ गाळे भाडे पट्टयाने दिलेली आहे ह्याबाबत कागदपत्राची पडताळणी केली असता सन १९९६ – १९९७ पासून दरमहा भाडे रक्कम वसूल केलेली नसल्याचे आढळून आले व ह्या संदर्भातील नोंदी नमुना क्रमांक ११ मध्ये घेऊन अद्यावत वसूली केलेली नसल्याचे आढळून आले.

| अ. क्र. | गाळाधारकांचे नाव | प्रती वर्ष भाडे × थकबाकी | थकीत एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | सौ. सुनिता रामदास राऊत | २५०० × १२ | ३०,००० |
| २ | सौ. सुमन तुळशीराम कापडणे | २५०० × १२ | ३०,००० |
| ३ | श्री. सुनिल कांतीलाल डुंगरवाल | २५०० × १२ | ३०,००० |
| ४ | श्री. प्रविण शांतीलाल कासलीवाल | २५०० × १२ | ३०,००० |
| | | (९६-९७ ते ०७-०८ एकूण १२ वर्षे) | |
| | | **एकूण** | १,२०,००० |

उपरोक्त थकीत भाडेची रक्कम संबंधितांकडून बँक व्याज दरासह वसूल करुन ग्रामनिधीत जमा करावे तसेच ह्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१. प्रत्येक गाळा ९९ वर्षाच्या कराराने दिल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून आले. ९९ वर्षाच्या कराराने देण्यासंदर्भात योग्य तो प्राधिकार नमुद करुन केलेल्या कार्यवाहीबाबत स्पष्टीकरण द्यावे.

२. आता बांधकाम विभागाकडून प्रत्येक गाळा बाजारभावाप्रमाणे काय दराने भाडेने आकारणी करावी लागेल ह्या संदर्भात प्रमाणपत्र प्राप्त करुन त्या दराने नव्याने ११ महिन्याचे कराराने आकारणी करुन योग्य त्या कागदपत्रांची पूर्तता करावी व त्या द्वारे ग्रामपंचायीचे उत्पन्नात भर टाकावयास सुरुवात करावी.

३. सदरच्या गाळाधारकांच्या नोंदी नमुना क्रमांक ११ ला घेऊन गाळा धारकांकडून दरमहा भाडे रक्कम वसूल करणेत यावी.

उपरोक्त अभिप्रायांची पूर्तता करावी.

---

**परिच्छेद क्रमांक :- १५ :- लिलाव थकबाकीबाबत.**

ग्रामपंचायतीने लेखापरीक्षण वर्षात दैनिक बाजार व आठवडे बाजार वसूलीसाठी लिलाव केलेला आहे ह्या लिलाव खर्ड्यांची पडताळणी केली असता खालील तपशिलाप्रमाणे रक्कमा थकीत असल्याचे आढळून आले.

| सन | लिलावाचा प्रकार | लिलाव घेणा-याचे नाव व लिलाव रक्कम | वसूल रक्कम | थकीत रक्कम |
|---|---|---|---|---|
| २००५ – २००६ | दैनिक बाजार | वसंत मुरलीधर शेलार रक्कम रु. ३,६५,५००/- | ६५,००० | ३,००,००० |
| २००६ – २००७ | दैनिक बाजार | छबु मुरलीधर उगले रक्कम रु. ३,०५,०००/- | ६८,६४४ | २,३६,३५६ |
| २००७ – २००८ | दैनिक बाजार | राजेंद्र दशरथ बदोडे रक्कम रु. ३,०१,५००/- (हेमंत रामभाऊ गुरव यांचेकडून वसूली) | २,१०,००० | ९१,५०० |
| २००५ – २००६ | आठवडे बाजार | निवृत्ती भाऊराव व्यवहारे रक्कम रु. ११,०३,०००/- | ५,५०,००० | ५,५३,००० |
| २००६ – २००७ | आठवडे बाजार | सुकदेव पारुजी पलोड रक्कम रु. ७,२०,०००/- | ५,२०,००० | २,००,००० |
| २००७ – २००८ | आठवडे बाजार | मंगेश मगन सांगळे रक्कम रु. १०,००,०००/- | १०,००,००० | निरंक |
| | | | **एकूण** | **११,१०,८५६** |

१. उपरोक्त नमुद आठवडे बाजार व दैनिक बाजार लिलावाची थकबाकी रक्कम रुपये ११,१०,८५६/- वसूलीबाबत ग्रामपंचायतीने अतिशय उदासिनता दाखवली आहे.

सदरची थकबाकी रक्कम संबंधितांकडून बँक व्याज दराने वसूल करुन ग्रामनिधीत जमा केल्याचे अनुपालन दाखवावे.

तसेच सन २००८ – २००९ ची दैनिक बाजार लिलावाद्वारे वसूल होणा-या रक्कमेपैकी सन २००७ – २००८ मध्ये सामान्य पावती क्रमांक ४६ दिनांक ३१.३.२००८ अन्वये रुपये ५०,०००/- श्री. सलिम अजीज बेग यांचेकडून वसूल करुन ग्रामनिधीत जमा आहे. उर्वरित रक्कमा सन २००८ – २००९ मध्ये संपूर्ण वसूल करुन थकबाकी निरंक झाल्याचे दाखवावे.

२. उपरोक्त नमुद लिलाव घेणा-या व लिलावाच्या वेळी सहभाग घेऊन जादा दराची रक्कमेबाबत ग्रामपंचायतीने मान्यता दिली त्या संदर्भात लेखापरीक्षण कालावधीत वसूली झाली त्याची पडताळणी केली असता दैनिक बाजार लिलाव सन २००७ – २००८ साठी श्री. राजेंद्र दशरथ बडोदे यांची बोली मंजूर झाली. त्याअनुषंगाने त्यांना बाजार वसूली करणेचे आदेश दिले. तथापि प्रत्यक्षात पंचायतीने श्री. हेमंत रामभाऊ गुरव यांचेकडून रुपये २,१०,०००/- वसूली केल्याचे आढळून आले.

एकाच्या नावाने लिलाव वसूली मंजूर करावयाचा व दुस-याच इसमाकडून रक्कमा वसूलीबाबतची कार्यवाही पार पाडावयाची ह्या अनियमिततेबाबत प्रशासकीय चौकशी होऊन, झालेल्या अनियमिततेबाबत योग्य ती कार्यवाही संबंधितांवर करावी.

---

**परिच्छेद क्रमांक :- १६ :- स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत चांदवड येथे शिवाजी चौक ते बाजार वस्ती (सोमवार पेठ) रस्ता कॉंक्रीटीकरण करणे व या रस्त्याच्या दुतर्फा गटारी बांधणे.**

नाशिक जिल्हा परिषदेचे कार्यादेश क्रमांक अनुक्रमे जिपना/बांख्रा/इवद-३/टेंडर/३९७/०६ दिनांक २१.३.२००६ व जिपना/बांख्रा/इवद-३/टेंडर/४३४/०६ दिनांक २४.३.२००६ नुसार रक्कम रुपये ७,६४,९५९/- व रुपये २,४९,०००/- अंदाजपत्रकीय दराने काम करणेबाबत ग्रामपंचायतीस आदेश दिलेले आहेत.
(दोनही कामांची एकूण अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १०,१३,९५०/-)

उपरोक्त दोनही कामांची मुदत अनुक्रमे दिनांक २०.९.२००६ व २३.६.२००६ पर्यंत देण्यांत आलेली होती. ह्या आदेशाचे अनुषंगाने जिल्हा परिषद, नाशिक यांचे कार्यालयाकडून खालील नमुद तपशिलाप्रमाणे अनुदान प्राप्त झाले असून ते ग्रामनिधी व पाणी पुरवठा निधी रोखवहीत जमा केलेली आहे.

| अ.क्र. | जमा अनुदान तपशिल | रक्कम रुपये | दिनांक |
|---|---|---|---|
| १ | पाणी पुरवठा निधीकडे | ४,८६,७२६ | ०३.११.२००६ |
| २ | ग्रामनिधीकडे जमा | १,५२,२५५ | २६.१०.२००६ |
| | **एकूण जमा** | ८,२०,६०७ | |

प्राप्त अनुदानाचे अनुषंगाने लेखापरीक्षण वर्षात खालीलप्रमाणे खर्च नोंदवला आहे.
१. पाणी पुरवठा निधीकडे रक्कम रुपये ४,८१,४६९/- खर्च
२. ग्रामनिधीकडे सन ०५-०६ रक्कम रुपये ७५,०००/- खर्च
सन ०६-०७ रक्कम रुपये ४,३२,५००/- खर्च
**एकूण रक्कम रुपये ९,८८,९६९/-**

ह्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदवण्यात येत आहेत.

१. रस्ता कॉँक्रीटीकरण व त्यानुसार गटार बांधकामासाठी नाशिक जिल्हा परिषदेने कार्यादेश दिलेले असून प्राप्त अनुदान रुपये ८,२०,६०७/- चे अनुषंगाने रस्ता कॉँक्रीटीकरणावर लेखापरीक्षण वर्षात रोखवहीत व प्रमाणकांत नोंदवलेल्या योग्य त्या शिर्षानुसार रक्कम रुपये ९,८८,९६९/- खर्च झालेला आहे.

ग्रामपंचायतीस रस्ता कॉँक्रीटीकरण व गटार बांधकामासाठी कार्यादेश दिलेले असतांना प्रत्यक्षात रोखवहीत व प्रमाणकाद्वारे रस्ता कॉँक्रीटीकरणावरच रुपये ९,८८,९६९/- खर्च नोंदवला आहे. लेखापरीक्षणांत वारंवार तोंडी सूचना व अर्धसमास पत्र क्रमांक ५ दिनांक १८.६.२००८ रोजी पत्र देऊनही ह्या दोनही कामांचे मोजमाप पुस्तिका, पूर्णत्वाच्या दाखला इत्यादी कागदपत्रे पडताळणीसाठी प्राप्त झालेले नाही. त्यामुळे प्राप्त अनुदानाच्या अनुषंगाने रस्ता कॉँक्रीटीकरण व गटार बांधकाम ह्यांवर एकूण किती खर्च झाला व तो वाजवी, योग्य असल्याबाबत खात्री पटवावी.

२. उपरोक्त नमुद दोनही कामांच्या कार्यादेशानुसार जिल्हा परिषदेने प्रथम धावते व अंतिम देयकातून कपात केलेल्या सुरक्षा अनामत रक्कमांची मागणी जिल्हापरिषदांकडे मागणी करुन रक्कम प्राप्त करुन ग्रामनिधीत जमा केल्याचे अनुपालन दाखवावे.

३. स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत मंजूर झालेल्या कामाचे अनुषंगाने प्राप्त अनुदान हे ग्रामनिधीत जमा करणे आवश्यक असतांना रुपये ४,८६,७२६/- चे अनुदान पाणी पुरवठा निधीत जमा करुन रुपये ४,८१,४६९/- ह्या निधीत खर्च करावयाचे प्रयोजन स्पष्ट करावे.

उपरोक्त अभिप्रायांची पुर्तता होऊन अनुपालन करावे तोपर्यंत खर्च रक्कम रुपये ९,८८,९६९/- आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहेत.

आक्षेपाधिन रक्कम रुपये ९,८८,९६९/-

---

**परिच्छेद क्रमांक :- १७ :- लेखापरीक्षण वर्षात वेळोवेळी केलेल्या कामांबाबत .**

ग्रामनिधीत सन २००५ – २००६ ते २००७ – २००८ मध्ये वेळोवेळी खालील तपशिलाप्रमाणे खर्च रोखवहीत नोंदवला आहे.

| सन | कामाचे नाव | खर्च रक्कम रुपये |
|---|---|---:|
| २००५ – २००६ | स्मशानभूमी संरक्षक भिंत | १,७५,००० |
| २००५ – २००६ | गटार दुरुस्ती | १,८०,००० |
| २००७ – २००८ | गटार दुरुस्ती | ४५,६१३ |

| | | |
|---|---|---|
| २००५ – २००६ | गाडगे महाराज चौक पार बांधणे | ३८,२०० |
| २००५ – २००६ | स्त्री शौचालय वाडगे वस्ती | ८५,००० |
| २००५ – २००६ | २० टक्के खर्च गटार दुरुस्ती | २०,००० |
| २००५ – २००६ | गावांतर्गत रस्ते दुरुस्ती<br>(प्रमाणक क्र. १११,१५५,१५६,१५७,२०१,२९०,<br>३७०,४१३,४१४,४६५,४६६) | १,५५,८०० |
| २००६ – २००७<br>व २००७ - ०८ | गुजराथी गल्ली रस्ता कॉंक्रीटीकरण<br>(प्रमाणक क्र. ७०,७४)<br>(६४,६६,६७,१२८) | ४७,६००<br>८९,१३०<br>१,३६,७३० |
| २००६ – २००७ | मराठी शाळेजवळ शौचालय बांधणे<br>(पॉवर हाऊसजवळ) | ४६,००० |
| २००६ – २००७ | मराठी शाळा दुरुस्ती | १,३०,९७० |
| २००७ – २००८ | मराठी शाळा दुरुस्ती | २५,००० |

उपरोक्त कामांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.

१. सन २००५ – २००६ ते २००७ – २००८ ह्या वर्षात उपरोक्त नमुद कामे हाती घेणेपूर्वी कामाचे बांधकाम विभाग, पंचायत समिती, चांदवड यांचेकडून अंदाजपत्रक तयार करुन त्यास सक्षम अधिका-यांची मान्यता घेतलेली नाही.

२. झालेल्या कामाची मोजमाप नमुना क्रमांक २३ मध्ये घेऊन झालेला खर्च योग्य व वाजवी झालेबाबत खात्री पटवावी.

३. उपरोक्त नमुद कामांचे मुल्यांकन दाखले विहीत नमुन्यात प्राप्त करावेत.

४. ह्या कामासंदर्भात लेखापरीक्षणांत अर्धसमास पत्र क्रमांक ५ दिनांक १८.६.२००८ रोजी देऊनही उपरोक्त अभिप्राय १ ते ३ मधील कागदपत्रे व नोंदवह्या उपलब्ध झालेल्या नाही. ह्याबाबत वर नमूद कामासंदर्भात चौकशी होऊन कामे झालेबाबत खात्री पटवावी.

उपरोक्त अभिप्रायांची पुर्तता करावी तोपर्यंत अ.क्र. १ ते ९ कामांवर झालेला खर्च रक्कम रुपये १७,३८,३१३/- आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

---

**परिच्छेद क्रमांक :- १८ :- दलित वस्ती सुधार योजना (ग्रामनिधी खातेमधील व्यवहाराबाबत)**

सन २००५ – २००६ व २००६ – २००७ ह्या आर्थिक वर्षात दलित वस्ती सुधार योजनेतंर्गत खालील नमुद तपशिलाप्रमाणे अनुदान प्राप्त झाले असून ते ग्रामनिधीमध्ये जमा करुन पुढील व्यवहार केलेला आहे.

| सन | दिनांक | प्राप्त अनुदान | |
|---|---|---|---|
| २००५ – २००६ | २५.३.२००६ | २,४०,००० | कोंबडवाडी भाग – १ व २ |
| | ३१.३.२००६ | ३,२०,००० | - |
| | **एकूण** | ५,६०,००० | |
| २००६ – २००७ | १८.८.२००६ | ८०,००० | कोंबडवाडी भाग – १ |
| | १८.८.२००६ | ८०,००० | कोंबडवाडी भाग – २ |
| | १८.१२.२००६ | ३,२०,००० | - |
| | **एकूण** | ४,८०,००० | |
| **एकूण एकंदर ५,६०,००० + ४,८०,००० = १०,४०,०००/-** | | | |

उपरोक्त नमुद अनुदान ग्रामनिधीत जमा झालेची व खर्च प्रमाणकांची पडताळणी केली असता रोखवहीत खर्ची टाकलेल्या रक्कमांसंदर्भात प्रमाणकांवर बाबवार नोंदी घेतलेल्या नसल्याचे आढळून आले.

ह्या संदर्भात पंचायत समितीकडून खालील नमुद तपशिलाप्रमाणे माहिती प्राप्त करण्यांत आली.

| अ. क्र. | कामाचे नाव | मंजूर अनुदान | अंदाजपत्रक | प्राप्त अनुदान |
|---|---|---|---|---|
| १ | लेंडीहट्टी माथावरती शौचालय | २,००,००० | २,४७,१३९ | २,००,००० |
| २ | मातंग वस्ती रस्ता कॉंक्रीटीकरण | २,००,००० | २,५२,२०४ | २,००,००० |
| ३ | देवी दरवाजा रस्ता कॉंक्रीटीकरण | २,००,००० | २,५६,४७९ | ८०,००० |
| ४ | कोंबडवाडी भाग – १ रस्ता कॉंक्रीटीकरण | २,००,००० | - | २,००,००० |
| ५ | कोंबडवाडी भाग – २ रस्ता कॉंक्रीटीकरण | २,००,००० | - | २,००,००० |
| ६ | रोहिदास नगर रस्ता कॉंक्रीटीकरण | २,००,००० | २,६५,०२८ | २,००,००० |
| ७ | रोहिदास नगर शौचालय | २,००,००० | २,४७,१३९ | ८०,००० |
| | | | **एकूण** | ११,६०,००० |

ह्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.

१. पंचायत समिती, चांदवड यांचेकडून प्राप्त माहितीनुसार अनुक्रमांक १ ते ७ कामांसाठी ग्रामपंचायतीस एकूण रुपये ११,६०,०००/- अनुदान वितरीत केले असून ग्रामपंचायतीच्या ग्रामनिधीत प्रत्यक्ष जमा रक्कम रुपये १०,४०,०००/- असून वितरीत अनुदान व जमा अनुदान ह्यात रुपये १,२०,०००/- चा फरक आहे. ह्या फरक रक्कमेसंदर्भात योग्य ती खात्री करुन जमा रक्कमेबाबत चौकशी होऊन रुपये १,२०,०००/- बाबत जबाबदारी निश्चित करावी.

२. उपरोक्त तपशिलात नमुद १ ते ७ कामांसदर्भात नस्ती व कागदपत्रे, मोजमाप नोंदवहीची पडताळणी केली असता खालील तपशिलातील कामे परीपूर्ण कागदपत्रांसह प्राप्त झाले.

**१) कोंबडवाडी भाग – १ रस्ता कॉंक्रीटीकरण सन २००५ – २००६**

| | |
|---|---|
| अंदाजपत्रक रुपये | २,५०,४७४/- |
| मंजूर अनुदान रुपये | २,००,०००/- |
| तांत्रिक मान्यता | ९७७ दिनांक २०.३.२००६ |
| प्रशासकीय मान्यता | जिपना/सक/दवसुयो/२९.३.२००६ |
| काम सुरु दिनांक | १.५.२००६ |
| काम पूर्ण दिनांक | ३१.८.२००६ |
| मुल्यांकन रुपये | २,०१,५३३/- |
| मोजमाप पुस्तिका क्रमांक | पृष्ठ क्रमांक १ ते १५ |
| रॉयल्टी भरणा बाकी रुपये | ४,८४५/- |

**२) कोंबडवाडी भाग – २ रस्ता कॉंक्रीटीकरण सन २००५ – २००६**

| | |
|---|---|
| अंदाजपत्रक रुपये | २,५०,४७४/- |
| मंजूर अनुदान रुपये | २,००,०००/- |
| तांत्रिक मान्यता | ९७३ दिनांक २०.३.२००६ |
| प्रशासकीय मान्यता | जिपना/सक/दवसुयो/२९.३.२००६ |
| काम सुरु दिनांक | १.५.२००६ |
| काम पूर्ण दिनांक | ३१.८.२००६ |
| मुल्यांकन रुपये | २,००,३५६/- |
| मोजमाप पुस्तिका क्रमांक | पृष्ठ क्रमांक १ ते १५ |
| रॉयल्टी भरणा बाकी रुपये | ४,८३०/- |

**<u>३)     लेंडी हट्टी (मातंगवस्ती) रस्ता कॉंक्रीटीकरण सन २००५ – २००६</u>**

| | |
|---|---|
| अंदाजपत्रक रुपये | २,५५,२०४/- |
| मंजूर अनुदान रुपये | २,००,०००/- |
| तांत्रिक मान्यता | ६९४ दिनांक १८.१.२००६ |
| प्रशासकीय मान्यता | जिपना/सक/दवसुयो/१६.३.२००६ |
| काम सुरु दिनांक | १६.३.२००६ |
| काम पूर्ण दिनांक | ३१.८.२००६ |
| मुल्यांकन रुपये | २,०१,५५७/- |
| मोजमाप पुस्तिका क्रमांक | उपलब्ध नाही |
| रॉयल्टी भरणा बाकी रुपये | - |

**<u>४)     रोहीदास नगर रस्ता कॉंक्रीटीकरण सन २००५ – २००६</u>**

| | |
|---|---|
| अंदाजपत्रक रुपये | २,००,०००/- |
| मंजूर अनुदान रुपये | २,००,०००/- |
| तांत्रिक मान्यता | ६९२ दिनांक १८.५.२००६ |
| प्रशासकीय मान्यता | जिपना/सक/दवसुयो/३०४८/२७.३.२००६ |
| काम पूर्ण दिनांक | ३०.८.२००६ |
| मुल्यांकन रुपये | २,०१,४६८/- |
| मोजमाप पुस्तिका क्रमांक | उपलब्ध नाही |
| रॉयल्टी भरणा बाकी रुपये | - |

उपरोक्त नमुद १ ते ४ कामांसंदर्भात अनुक्रमांक १ व २ च्या कामाचे रॉयल्टी रक्कम रुपये ९,६७५/- (४,८३० + ४,८४५) लेखापरीक्षण कालावधी पर्यंत शासनास भरणा केलेली नाही. सदरची रक्कम तात्काळ शासन सदरी भरणा केल्याचे दाखवावे.

तसेच अनुक्रमांक ३ व ४ चे कामांबाबत मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणांत उपलब्ध झाल्या नाही. त्यामुळे स्वामीत्व धनाची (रॉयल्टी) रक्कम किती शासनास भरणा करणे बाकी आहे ह्याची पडताळणी करता आली नाही. ह्या संदर्भात लेखापरीक्षणांत अर्धसमास पत्र क्रमांक २,५ दिनांक १७.६.२००८ रोजी देऊनही पुस्तिका उपलब्ध केलेली नाही.

ह्या संदर्भात खर्च योग्य झालेबाबत खात्री पटवावी.

३. लेंडी हट्टी (मातंग वस्ती) शौचालय, देवी दरवाजा रस्ता कॉंक्रीटीकरण व रोहिदास नगर शौचालय या कामांसाठी प्राप्त झालेल्या अनुदानाचे अनुषंगाने केलेल्या खर्चासंदर्भात पडताळणी केली असता ग्रामनिधीत या योजनेतंर्गत करावयाच्या कामासंदर्भात खर्च टाकलेली प्रमाणके परीपूर्ण नसल्याने प्रत्यक्ष किती खर्च झाला ह्याची माहिती उपलब्ध करता आली नाही.

ह्या संदर्भात लेखापरीक्षण कालावधीत अर्धसमास पत्र क्रमांक २ दिनांक १७.६.२००८ रोजी देऊनही परिपूर्ण माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. उपरोक्त नमुद कामांची मंजूर अंदाजपत्रके, तांत्रिक मान्यता व मोजमाप पुस्तिका उपलब्ध करुन खर्च योग्य झालेबाबत खात्री पटवावी.

४. उपरोक्त नमुद अभिप्राय ३ मधील देवी दरवाजा रस्ता कॉंक्रीटीकरण व रोहिदास नगर शौचालय ह्या कामासाठी पंचायत समिती चांदवड कार्यालयाकडून प्रथम हप्ता अनुक्रमे रुपये ८०,०००/- व रुपये ८०,०००/- प्रदान केले असून काम अपूर्ण अथवा प्रगती काहीच नसल्याचे सांगण्यात आले. ह्या कामांबाबत ग्रामपंचायतीस अर्धसमास पत्र क्रमांक २ दिनांक १७.६.२००८ रोजी देऊन माहिती मागवण्यात आली.

५. समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक दवसुयो / परिपूर्ण प्रस्ताव / का – १२/९५ – ०६ दिनांक १.११.१९९५ मधील अनुक्रमांक १४ मधील नमुद अटी व शर्ती क्रमांक २ नुसार दलित वस्ती सुधार योजनेची रक्कम स्वतंत्र लेखे ठेऊन बँकेत ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी व गटविकास अधिकारी यांचे संयुक्त नावे खाते उघडणे आवश्यक असतांना उपरोक्त नमुद कामांसाठी प्राप्त अनुदाने व केलेला खर्च ग्रामनिधीतून नियमबाह्य करणेबाबत संबंधितांवर प्रशासकीय कार्यवाही करणेत यावी.

तसेच या योजनेचे संयुक्त खाते उघडणे संदर्भात पंचायत समिती, चांदवड यांनी वेळोवेळी कोणती कार्यवाही केली व ह्या कार्यवाही संबंधित ग्रामविकास अधिकारी जुमानत नसलेने त्यांचे विरुध्द काय प्रशासकीय कार्यवाही केली याबाबतचा अहवाल प्राप्त करुन ह्या अनियमिततेस जबाबदार असणा-यांवर कार्यवाही करुन ह्या योजनेत झालेल्या गंभीर उणीवांची जबाबदारी निश्चित करावी व तसा अहवाल लेखापरीक्षणांस सादर करावा.

उपरोक्त अभिप्रायांची पुर्तता होऊन दाखवावी.

---

## परिच्छेद क्रमांक :- १९ :- दलित वस्ती सुधार योजनेच्या केलेल्या कामाबाबत

लेखा परिक्षणात ग्रामपंचायतीस ०५/०६ ते ०७/०८ मध्ये दलित वस्ती सुधार योजनेतून अनूदान प्राप्त असून विकास कामे केलेली आहे. परंतु केलेली कामे त्याच साली पुर्ण केलेली आहेत किंवा अनुदान ज्या प्रयोजनासाठी त्याच प्रयोजनासाठी वापरलेली

आहे किंवा नाही याबाबतचे दस्तावेज व विनियोग दाखले लेखापरिक्षणात प्राप्त झालेले नाही. तरी ग्रामपंचायतीने वरील प्रमाणे कार्यवाही करुन पुढील लेखा परिक्षणात दाखवावी.

---

**परिच्छेद क्रमांक :- २० :- गावातील कचरा उचलून टाकणेबाबत.**

ग्रामपंचायतीने लेखापरीक्षण वर्षात खालील नमुद तपशिलाप्रमाणे गावातील केरकचरा ट्रॅक्टरमध्ये उचलून इतरत्र टाकणेसाठी खर्च केलेला आहे.

| प्रकरण क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|---|
| १२ | १९.०४.२००५ | १०,००० | श्री. राजू छबू भुरे |
| १७३ | २८.०९.२००७ | ३,००० | सोमनाथ भिमसिंग निरभवणे |
| १७४ | २९.०९.२००७ | ७,७०० | राजू छबू भुरे स्वाक्षरी नाही |
| १७५ | ०३.१०.२००७ | ७,००० | राजू छबू भुरे स्वाक्षरी नाही |
| १८७ | १५.१०.२००७ | ८,००० | राजू छबू भुरे स्वाक्षरी नाही |
| १९४ | २६.१०.२००७ | ५,००० | ज्ञानेश्वर तुकाराम भालेराव |
| २०६ | ३१.१०.२००७ | ४,१०० | राजू छबू भुरे |
| - | १७.०१.२००८ | १८,००० | अशोक बाळासाहेब वाघ |
| - | २१.०१.२००८ | १०,००० | सोमनाथ बाळू कापसे |
| - | ०१.०२.२००८ | १५,००० | छबु भुरे |
| - | १६.०२.२००८ | २७,००० | अशोक बाळासाहेब वाघ |
| - | १८.०३.२००८ | १७,४०० | अशोक बाळासाहेब वाघ |
| | | १,३२,२०० | |

उपरोक्त नमुद खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१. उपरोक्त नमुद खर्च रुपये १,३२,२००/- केलेला असून ह्या संदर्भात कोणताही करारनामा संबंधित ट्रॅक्टर मालकाशी केलेला नाही. तसेच दिवसभरात कोणत्या भागातून किती ट्रक कचरा डेपोत टाकला ह्याबाबत नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे प्रदान रक्कमेची अचूकता पडताळता आली नाही.

२. ग्रामपंचायतीकडे स्वतःचा ट्रॅक्टर असतांना खाजगी ट्रॅक्टर भाडेने घेण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

३. गावातील केरकचरा गोळा करुन एका ठिकाणी केलेला डेपोमधील साचवलेले खताचा लिलाव लेखापरीक्षण वर्षात केलेला नाही. ह्याबाबत खुलासा करुन त्या कच-याचा लिलाव करुन रक्कम जमा करावी.

उपरोक्त अभिप्रायांची पूर्तता करावी, तोपर्यंत खर्च रुपये १,३२,२००/- आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

---

**परिच्छेद क्रमांक :- २१ :- कचराकुंड्या खरेदीबाबत.**

प्रमाणक क्रमांक ७१ दिनांक १२.६.२००६ अन्वये मे. पाटील फेब्रिकेशन यांना रक्कम रुपये १०,०००/- १० नग कचराकुंड्या पुरवल्याबाबत प्रदान केली आहे.

खरेदी केलेल्या कुंड्यांची नोंद नमुना क्रमांक १९ मध्ये नाही. तसेच प्राप्त १० नग कुंड्या गावात कोणत्या ठिकाणी ठेवल्या व त्याचा विनियोग योग्य पध्दतीने होत असल्याबाबत खात्री पटवावी. तोपर्यंत खर्च लेखापरीक्षणांत आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

---

**परिच्छेद क्रमांक :- २२ :- वैयक्तिक शौचालय बांधणेसाठी खर्च**

लेखापरीक्षण वर्षात खालील नमुद तपशिलाप्रमाणे वैयक्तिक शौचालय बांधणेसाठी लाभार्थींना अनुदान प्रदान केले आहे.

| प्रकरण क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|---|
| १० | २६.०४.२००६ | ५०० | शशिकला चिंतामण जाधव |
| १६ | २८.०४.२००६ | ५,००० | श्री. अशोक गांगुर्डे |
| १७ | २८.०४.२००६ | ५,००० | श्री. गुलाब गवळी |
| २३९ | २८.१२.२००६ | ४,५०० | श्री. ज्ञानेश्वर भालेराव |
| | **एकूण** | **१५,०००** | |

उपरोक्त नमुद लाभार्थींना शौचालय वाटप केल्यानंतर संबंधितांनी शौचालये बांधली किंवा कसे ह्याबाबत खात्री पटवावी. तसेच ह्याबाबत नोंदी नमुना क्रमांक ८ ला घेऊन रक्कमा प्रदान केल्याच्या कालावधीतच शौचालय बांधले किंवा कसे ह्याबाबत खात्री पटवावी तोपर्यंत खर्च लेखापरीक्षणांत आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

---

**परिच्छेद क्रमांक :- २३ :- दैनिक वृत्तपत्रात शुभेच्छा जाहिरात दिल्याबाबत.**

लेखापरीक्षण वर्षात खालील नमुद तपशिलाप्रमाणे दैनिक लोकमत, देशदुत, गावकरी व साप्ताहिक कोटीभास्कर ह्या वृत्तपत्रात शुभेच्छा जाहिरातीबाबत खर्च नोंदवला आहे.

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|---|
| २२ | ०२.०५.२००६ | ५,००० | दैनिक लोकमत |
| १३० | ०६.०९.२००६ | ६,००० | दैनिक गावकरी |
| १५७ | १४.१०.२००६ | ५,००० | दैनिक गावकरी बील नाही |
| १८२ | १८.११.२००६ | ५,००० | साप्ताहिक कोटीभास्कर |
| २०० | ०८.१२.२००६ | ३,००० | दैनिक देशदूत |
| २७२ | ०१.०२.२००७ | ७,००० | वाचनालय देणगी |
| २९३ | ०१.०२.२००७ | ७,००० | दैनिकात शुभेच्छा पेपर नाव नाही |
| २९५ | २१.०२.२००७ | ३,००० | दैनिक लोकमत |
| २९७ | २३.०२.२००७ | ८,५०० | दैनिक देशदूत |
| | | ४९,५०० | |

उपरोक्त नमुद तपशिलातील खर्च वृत्तपत्रात वेगवेगळ्या प्रकरणी शुभेच्छांसाठी केलेला आहे. अशा प्रकारचा खर्च ग्रामपंचायत निधीतून करणेसंदर्भात कायद्यात तरतूद नाही. त्यामुळे केलेला खर्च नियमबाह्य आहे. नियमबाह्य केलेला खर्च रुपये ४९,५००/- वसूलीबाबत जबाबदारी निश्चित करुन रक्कम ग्रामनिधीत जमा केल्याचे अनुपालन दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक :- २४ :- ग्रामपंचायत निवृत्त कर्मचा-यांना उपदानाची रक्कम प्रदान केल्याबाबत.**

लेखापरीक्षण वर्षात खालील तपशिलाप्रमाणे उपदान (ग्रॅङ्चूटी) रक्कमा निवृत्त कर्मचा-यांना प्रदान केल्या आहे.

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|---|
| १९९(१) | ०४.०८.२००१ | ५,००० | सुग्राबी शेख इस्त्राइल |
| १५२ | २४.०९.२००५ | ५०,००० | इस्त्राइल बाळू शेख |
| १६१ | ०३.१०.२००५ | १,००० | बाळूभाई इस्त्राइल शेख |
| २२९ | २३.११.२००५ | ५०० | इस्त्राइल बाळू शेख |

| | | | |
|---|---|---|---|
| २३० | २३.११.२००५ | ५०० | मिरा सखाराम कापसे |
| २३७ | २८.११.२००५ | ४,६५४ | बाळू इस्त्राइल शेख |
| २६५ | १४.१२.२००५ | २,५०० | शेख रफिक अब्दुल गवळी |
| २८२ | १९.१२.२००५ | १,८४८ | रुक्मिणीबाई झोले |
| ३२४ | १४.०१.२००६ | ३,००० | अब्दुल रफिक गवळी |
| ३४७ | २७.०१.२००६ | २,००० | बाळू शंकर कापडणे |
| ४२७ | ०९.०३.२००६ | ३,४६८ | अब्दुल रफिक गवळी |
| ४६० | २७.०३.२००६ | ५०,९९७ | अब्दुल रफिक गवळी |
| ४६१ | २७.०३.२००६ | ३३,६०२ | रुक्मिणी बनारसी सौडे |
| | | **१,१४,०६९** | |

ह्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.

१. ग्रामपंचायतीच्या उपरोक्त नमुद कर्मचा-यांचे सेवापुस्तकाची पडताळणी केली असता सेवापुस्तकातील नोंदी प्रथम नेमणूकीपासून अपूर्ण असलेचे आढळून आले.

२. सेवापुस्तकातील वेळोवेळी वेतनवाढ, रजा इत्यादी बाबतच्या नोंदी नोंदवल्या नसलेमुळे सेवानिवृत्तीनंतर प्रदान उपदानाच्या रक्कमेबाबत नेमके कोणते वेतन विचारात घेतले, सेवा किती झाली व सेवानिवृत्तीचे वय शासन धोरणानुसार होते किंवा कसे ह्याची सत्यता पडताळता आली नाही.

उपरोक्त अभिप्रायानुसार सेवानिवृत्त कर्मचा-यांना प्रदान उपदानाची रक्कम अचूक दिल्याबाबत खात्री पटवावी. तोपर्यंत खर्च आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

---

**परिच्छेद क्रमांक :- २५ :- नमुना क्रमांक २२ प्रमाणे रोजंदारी कर्मचारी यांना मंजूरी प्रदानाबाबत.**

ग्रामनिधी रोखवहीत नमुना क्रमांक २४ वेतनासोबत रोजंदारी कर्मचा-यांना मजूरी प्रदान केली आहे. अहवालासोबत जोडलेल्या परिशिष्ठ ३ मध्ये नमुद केल्यानुसार रोजंदारी कर्मचा-यांना पृष्ठ क्रमांक १ ते ४५ नुसार मंजूरी प्रदान केली आहे.

ह्या पृष्ठ १ ते ४५ वरील नमुना क्रमांक २२ ची पडताळणी केली असता रोखवहीत नमुद खर्च रक्कम व मजूरांची मजूरी रक्कम यात तफावत आढळून आली. तसेच त्यात्या महिन्यातील हजर दिवसांची हजेरी व रोज काय दराने मजुरी दिली ह्याच्या नोंदी, व स्वाक्ष-या नसल्याने रोखवहीत खर्च रक्कमांची पडताळणी करता आली नाही. खर्च टाकलेल्या रक्कमा या मोघम स्वरुपी टाकणेचे स्पष्ट होते

ह्या संदर्भात अर्धसमास पत्र क्रमांक ५ दिनांक १७.०६.२००८ रोजी देऊनही ह्या पृष्ठ क्रमांक १ ते ४५ बाबतचे पूर्ण रकाने भरुन प्रदान रक्कमांबाबत योग्य तो मेळ घेऊन खर्च रक्कम बरोबर असेलबाबत खात्री करवून दिलेली नाही.

ह्या अनियमिततेमुळे ह्या व्यवहारासंदर्भात प्रशासकीय चौकशी होऊन संबंधितांवर योग्य ती कार्यवाही करावी व त्यात अनियमित प्रदान रक्कमा आढळून आल्यास त्याची वसूली करुन ग्रामनिधीत जमा केल्याचे अनुपालन दाखवावे. तोपर्यंत खर्च लेखापरीक्षणांत आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

एकूण खर्च रक्कम रुपये ५,९८,४२९/-

---

**परिच्छेद क्रमांक :- २६ :- ग्रामनिधी व पाणी पुरवठा कर वसूली पावती पुस्तकांबाबत**

ग्रामपंचायत सन २००५ – २००६ ते २००७ – २००८ चे लेखापरीक्षण करतांना ग्रामनिधी व पाणीपुरवठा कर वसूली पावती पुस्तकांची पडताळणी करणेसाठी लेखापरीक्षण वर्षात घरपट्टी, पाणी पट्टी व इतर कर वसूली संदर्भात वापरलेल्या पावती पुस्तकांचा हिशोब नमुना क्रमांक १८ साठा नोंदवहीत नोंदी न घेतल्यामुळे पडताळ्ता आला नाही व ज्या पावती पुस्तकांच्या सहाय्याने वसूली केली तेवढीच पावती पुस्तके लेखापरीक्षण वर्षात वापरली किंवा कसे ह्याबाबत अर्धसमास पत्र १ दिनांक २६.०५.२००८ देऊनही ह्याबाबत समर्पक स्पष्टीकरण ग्रामपंचायतीने केले नाही.

त्यामुळे वापरलेल्या पुस्तकांव्यतिरिक्त लेख्याबाहेर पावती पुस्तके वापरुन रक्कमा वसूलीची नियमबाह्य कार्यवाही झाली असल्याबाबतची शक्यता नाकारता येत नाही. ह्याबाबत प्रशासकीय चौकशी होऊन अशाप्रकारची अनियमितता झाली नसल्याबाबत खात्री पटवावी.

---

**परिच्छेद क्रमांक :- २७ :- खाजगी अधिकृत धारकांची जोडणीबाबत.**

लेखापरीक्षणात ग्रामपंचायतीने ग्रामीण पाणी पुरवठा निधीत खाजगी नळ धारकांची नोंद लेख्यात घेतलेली नाही. त्यामुळे पाणी पट्टी वसूली व अधिकृत नळ धारकांची संख्या किती याबाबत लेखापरीक्षणात माहिती उपलब्ध झालेली नाही. तरी ग्रामपंचायतीने योग्य ती कार्यवाही करुन व पुढील लेखापरीक्षणात खात्री पटवावी.

---

## परिच्छेद क्रमांक :- २८ :- सन २००७ – २००८ दलित वस्ती प्राप्त अनुदान व खर्चाबाबत.

ग्रामपंचायतीस सन २००७ – २००८ ह्या वर्षात वेगवेगळ्या भागासाठी रस्ता कॉंक्रीटीकरण व शौचालय बांधणेसाठी एकूण रक्कम रुपये २५,२०,०००/- अनुदान प्राप्त झाले असून लेखापरीक्षण वर्षात २३ कामे हाती असून १२ रस्ता कॉंक्रीटीकरणाची कामे पूर्ण झालेली असून उर्वरित ११ कामे अपूर्ण आहे.

लेखापरीक्षण वर्षात पूर्ण असलेली कामे खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | खर्च रक्कम | मुल्यांकन | रॉयल्टी |
|---|---|---|---|---|
| १ | खालिक वस्ती रस्ता कॉंक्रीटीकरण | १,९८,५०० | २,००,००० | ४,३२० |
| २ | मोठा राजवाडा भाग – १ | २,००,००० | २,००,००० | ४,३०२ |
| ३ | मोठा राजवाडा भाग – २ | २,००,००० | २,००,००० | ४,३१९ |
| ४ | कालिका देवी रोड | २,००,००० | २,००,००० | १,३०५ |
| ५ | मातंगवस्ती भाग – १ | २,००,००० | १,००,००० | २,१६० |
| ६ | मातंगवस्ती भाग – २ | १,००,००० | १,००,००० | २,२०८ |
| ७ | मोठा राजवाडा | १,००,००० | २००,००० | ४,१८१ |
| ८ | मोठा राजवाडा | २,००,००० | १,००,००० | २,२२४ |
| ९ | मोठा राजवाडा | ९८,५०० | १,००,००० | २,०९३ |
| १० | आंबेडकरनगर भाग – १ | ९८,५०० | १,००,००० | २,२३० |
| ११ | आंबेडकरनगर भाग – २ | ९८,५०० | १,००,००० | २,२२२ |
| १२ | सिध्दार्थ नगर भाग – २ | २,००,००० | २,००,००० | ४,४४० |
| | | | | ३९,००४ |

उपरोक्त कामे लेखापरीक्षण वर्षात पूर्ण असून पूर्ण झालेल्या कामांसंदर्भात मोजमाप पुस्तिकेची पडताळणी केली असता स्वामित्व धनाची रक्कम रुपये ३९,००४/- (रॉयल्टी) शासनास भरणा करुन दाखवावी तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण दिनांक २९.८.२००५ नुसार नोंदणीकृत नसलेल्या ठेकेदारांकडुन ४% कार्यकंत्राट कराची रक्कम रुपये ७१,७००/- शासन सदरी भरणा करावी.

लेखापरीक्षण वर्षात खालील नमुद तपशिलातील कामे अपूर्ण असून ती पूर्ण झालेनंतर ह्याबाबत अंतिम अभिप्राय नोंदवण्यांत येतील.

| अ.क्र. | कामाचे नाव | खर्च रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | देवी दरवाजा | ८०,००० |
| २ | डॉ. आंबेडकर चौक | ८०,००० |
| ३ | हनुमान नगर | ८०,००० |
| ४ | देवी दरवाजा | ८०,००० |
| ५ | डॉ. आंबेडकरनगर | ८०,००० |
| ६ | सिध्दार्थ नगर | ८०,००० |
| ७ | हनुमान नगर | ८०,००० |
| ८ | कालिका देवी रोड | ४०,००० |
| ९ | हनुमान नगर | ४०,००० |
| १० | देवी दरवाजा | ४०,००० |
| ११ | सिध्दार्थ नगर | ४०,००० |

ह्या निधीबाबतचा जमा खर्च तक्ता सोबत जोडलेला आहे.

---

**परिच्छेद क्रमांक :- २९ :- संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना सन २००७ – २००८ मधील काही भाग ग्रामनिधीतून खर्च करणेबाबत.**

संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेतून सन २००७ – २००८ मध्ये रुपये २,५६,७४०/- अनुदान प्राप्त झाले असून, ह्या वर्षात गटार बांधकामाचे मंजूर अंदाजपत्रक रुपये ३,१३,५००/- प्रमाणे काम करुन मोजमाप नोंदवहीतील नोंदीनुसार रुपये ३,१२,८८९/- खर्च केला आहे.

तथापि संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेत प्राप्त अनुदान केलेल्या कामापेक्षा कमी असल्याने व ही योजना बंद झालेमुळे पुनश्च ह्या योजनेतून अनुदान प्राप्त होणार नसलेमुळे ग्रामपंचायतीने मासिक सभा ठराव १४४(११) दिनांक २२.३.२००८ अन्वये उर्वरित कामाचे रुपये ४६,०००/- चे खर्चासाठी ठराव पारीत करुन तेवढी रक्कम ठेकेदाराकडून अनामत स्वरुपात प्राप्त करुन व्यवहार नोंदवला आहे.

संबंधित मक्तेदारास रुपये ४६,०००/- अनामत पारीत ठरावाप्रमाणे देणे आहे व ती पंचायतीची जबाबदारी आहे. ह्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी तोपर्यंत खर्च लेखापरीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

---

**परिच्छेद क्रमांक :- ३० :- करांची थकबाकी बाबत**

या अहवालासोबत जोडलेल्या विविरणपत्राप्रमाणे लेखापरीक्षण कालावधीत पाणीपट्टी थकबाकी रक्कम रुपये २५,९२,७५५/- करांची थकबाकी असल्याचे दिसून आले. ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १२९ नुसार करांची १००% वसूली न केल्यामुळे पंचायतीचे आर्थिक नुकसान झालेले आहे. सदरच्या नुकसानीस पंचायत पदाधिकारी जबाबदार आहेत. आता वरील नियमाप्रमाणे १००% करांची वसूली करावी व थकबाकी राहणार नाही अशी तजवीज करावी.

करांची आकारणी व मागणी नोंदवहीबाबत –

लेखापरीक्षण कालावधीत करांची आकारणी व मागणी नोंदवही तपासता करांच्या मागणी नोंदवहीत संपूर्ण वसूलीच्या पावत्या खताविलेल्या नाहीत. पानवार आकारणी, मागणी व थकबाकी यांच्या बेरजा घेणेत आलेल्या नसून अखेरीस बेरीज काढलेली नाही. तसेच आकारणी व मागणी नोंदवहीचा मेळ घेता, मेळ जमत नाही. त्यामुळे वर्षाच्या सुरुवातीस मागील व चालु अशी एकूण करांची थकबाकी किती आहे याची पडताळणी करुन पाहता आली नाही. त्यामुळे अहवालासोबत भरपाई करांची थकबाकी किती आहे हे कळून येत नाही. तरी संबंधित नोंदवहयांच्या मेळ घेण्यात यावा. सदरच्या महत्त्वाच्या नोंदवहया अपूर्ण का ठेवण्यात आल्यात याचा साधार खुलासा करावा व आता मागील सर्व नोंदीसह नोंदवहया अद्यावत करुन दप्तरी ठेवाव्यात.

---

**परिच्छेद क्रमांक :- ३१ :- दरपत्रकाअभावी साहित्य खरेदी केल्याबाबत**

लेखापरीक्षा मुदतीत पंचायतीने खालील खर्च साहित्य खरेदी करीता केलेला आहे. मात्र सदर साहित्य खरेदी करणेपूर्वी शासन निर्णय क्र. एम. सी. ई. १०८३/सी.आर. /६९२/जी.ई.एम. ५ दिनांक १२.१२.१९८४ अन्वये निर्देशित केल्याप्रमाणे वेगवेगळ्या विक्रेत्यांकडून स्पर्धात्मक दरपत्रके मागविली नसल्याने, त्यामुळे बाजारातील स्पर्धेच्या लाभास पंचायतीस मुकावे लागले आहे. सबब खालील दर्शविलेली साहित्य खरेदी वाजवी दरातच केली किंवा कसे याचा साधार खुलासा करावा व सदर खर्चास सक्षम अधिका-यांची मान्यता घ्यावी, तो पावेतो खालीलप्रमाणे खर्च रक्कम रुपये ५,०४,८२७/- लेखापरीक्षणास आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

| वर्ष | प्र. क्र. | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|---|
| २००७ – २००८ | - | १३.२.२००८ | १२,९३० | मे. आशिर्वाद इलेक्ट्रीकल २३० नग खुर्च्या |
| | | ३१.३.२००८ | ४,९१,८९० | हायड्रोकोटीक गाडी खरेदी कांचन मोटर्स |
| | | एकूण | ५,०४,८२७ | |

---

## <u>महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखा परीक्षा १९६१ चे नियम १७ (क) खालील अनियमितता</u>

---

**<u>परिच्छेद क्रमांक :- ३२ :- करांच्या वसूल रक्कमा रोखवहीत जमा नसणेबाबत.</u>**

ग्रामपंचायतीने विविध करांपोटी वसूल केलेल्या रक्कमांची पडताळणी केली असता खालील तपशिलात नमुद रक्कमा रोखवहीत (ग्रामनिधी) व (पाणीपट्टी) जमा नसल्याचे आढळून आले.

<u>अ) ग्रामनिधी</u>

| पावती क्रमांक | दिनांक | वसूल रक्कमा | रोखवहीत जमा नसलेली रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|---|
| ८५५ | ३१.३.२००६ | २,८०६ | २,८०६ | घरपट्टी कापडीया |
| ८५६ | ३१.३.२००६ | ७,१९० | ७,१९० | घरपट्टी शेळके |
| ८५७ | ३१.३.२००६ | ३,१२६ | ३,१२६ | घरपट्टी |
| ८५८ | ३१.३.२००६ | ९८० | ९८० | घरपट्टी |
| ८५९ | ३१.३.२००६ | २,८०६ | २,८०६ | घरपट्टी चंद्रकांत अशोक |
| ८६० | ३१.३.२००६ | २,८०६ | २,८०६ | घरपट्टी |
| ८६१ | ३१.३.२००६ | २,८३१ | २,८३१ | घरपट्टी |
| ८६२ | ३१.३.२००६ | २,८३१ | २,८३१ | घरपट्टी |
| १ ते ३३ | ३१.३.२००६ | २८,४६४ | २०० | घरपट्टी |
| ३४ | ३१.३.२००६ | ५६० | ५६० | घरपट्टी राजेंद्र बाबुराव |
| ३५ | ३१.३.२००६ | ३०८ | ३०८ | घरपट्टी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५६ | ३१.३.२००७ | ८७५ | ८०० | घरपट्टी कस्तुरचंद आनंदरामजी |
| १०० | १०.१२.२००७ | १,६४१ | १,६४१ | घरपट्टी सुकदेव पवार |
| ५३७ ते ५४१ | १८.१.२००७ | ५,४१२ | २०० | घरपट्टी |
| ३३० | २२.१२.२००६ | २०० | २०० | धंदेकर |
| ३३१ | २२.१२.२००६ | २०० | २०० | धंदेकर |
| ३३२ | २२.१२.२००६ | ३०० | ३०० | धंदेकर |
| ३३३ | ४.१.२००७ | २०० | २०० | धंदेकर |
| ३३४ | १२.१.२००७ | २०० | २०० | धंदेकर |
| ३३५ | ३०.३.२००७ | २०० | २०० | धंदेकर |
| ३३६ | ३०.३.२००७ | २०० | २०० | धंदेकर |
| ३३७ | ७.४.२००७ | २०० | २०० | धंदेकर |
| ३३८ | ९.५.२००७ | २०० | २०० | धंदेकर |
| ३३९ | ११.५.२००७ | २०० | २०० | धंदेकर |
| ३४० | २२.१.२००७ | २०० | २०० | धंदेकर |
| ३४१ | २६.६.२००७ | २०० | २०० | धंदेकर |
| ३४२ | २७.७.२००७ | २०० | २०० | धंदेकर |
| ३४३ | २७.७.२००७ | २०० | २०० | धंदेकर |
| ३४४ | ३०.७.२००७ | २०० | २०० | धंदेकर |
| १९८८ | १६.८.२००५ | १,६०० | १,६०० | शाळा भाडे |
| | **एकूण** | | ३३,७८५ | |

**ब) पाणी पट्टी**

| पावती क्रमांक | दिनांक | वसूल रक्कमा | रोखवहीत जमा नसलेली रक्कम | कमी जमा | तपशिल |
|---|---|---|---|---|---|
| १२८ | २०.१०.२००६ | १,०८० | - | १,०८० | पांडूरंग बिरार खास पाणीपट्टी |
| ८० ते ८७ | ५.४.२००६ | ८,६०० | ७,५२५ | १,०७५ | खास पाणीपट्टी |
| ३३२ | २५.१.२००६ | १,०७५ | - | १,०७५ | पठाण नळ कनेक्शन |
| ३९ ते ४२ | २२.२.२००६ | ४,३०० | - | ४,३०० | नळ कनेक्शन |
| ५३ | ३.१.२००७ | १,०७५ | - | १,०७५ | मंगेश बनकर |
| २३०६ ते २३०८ | १.१०.२००७ | ३,२४० | - | ३,२४० | नळ कनेक्शन |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५३७ ते ६२५ | ३१.३.२००७ | ४५,७०० | २९,५१० | १६,१९० | पाणी पट्टी |
| | | | **एकूण** | **२८,०३५** | |

उपरोक्त नमुद वसूल रक्कमा रोखवहीत जमा नसल्याचे आढळून आल्यात व त्यामुळे ह्या वसूल रक्कमांचा संबंधितांनी कायम स्वरुपी अपहार केल्याचे स्पष्ट होते. ह्याबाबत प्रशासकीय कार्यवाही होऊन अपहारीत रक्कम ग्रामनिधीत रुपये ३३,७८५ + ग्रामीण पाणी पुरवठा निधीत रुपये २८,०३५ = एकूण रुपये ६१,२८०/- संबंधितांकडून दंडनीय दराने वसूल करुन निधीत जमा करावीत.

---

**परिच्छेद क्रमांक :- ३३ :- कर्मचा-यांचे वेतनाची रक्कम दुबार खर्ची टाकणेबाबत.**

नमुना क्रमांक २४ वेतन नोंदवही व रोखवहीची पडताळणी केली असता खालील नमुद तपशिलाप्रमाणे वेतनावर दुबार रक्कम खर्ची टाकल्याचे आढळून आले.

| प्र.क्र. | दिनांक | प्रदान रक्कम | दुबार रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|---|
| ९६ | ६.७.२००६ | २०,३६७ | - | माहे जून २००६ चे वेतन |
| १०५ | १७.७.२००६ | - | ३०,००० | माहे जून २००६ चे वेतन दुबार प्रदान |
| - | ३१.८.२००७ | २६,८७० | - | माहे जूलै २००७ चे वेतन |
| १४५ | २४.८.२००७ | - | ३८,००० | माहे जूलै २००७ चे वेतन दुबार प्रदान |
| - | ६.६.२००६ | २१,५६७ | - | माहे मे २००६ चे वेतन |
| ७३ | १२.६.२००६ | - | २७,२४८ | माहे मे २००६ चे वेतन दुबार प्रदान |
| | | **एकूण** | ९५,२४८ | |

उपरोक्त नमुद तपशिलाप्रमाणे नियमित वेतन प्रदान झालेनंतरही त्याच महिन्याचे वेतन रोखवहीत दुबार खर्ची टाकून रुपये ९५,२४८/- चा कायम स्वरुपी अपहार केल्याचे आढळून आले.

दुबार खर्ची रक्कमेबाबत प्रशासकीय चौकशी होऊन दुबार खर्ची रक्कम रुपये ९५,२४८/- संबंधितांकडून दंडनीय व प्रशासकीय कार्यवाहीअंती वसूल करुन ग्रामनिधीत जमा करावे.

---

**परिच्छेद क्रमांक :- ३४ :- अंगणवाडी शौचालय बांधकामाबाबत.**

ग्रामपंचायतीच्या रोखवहीत दिनांक ९.१०.२००६ रोजी रक्कम रुपये ५०,०००/- चांदवड ग्रामपंचायती अंतर्गत असलेल्या अंगणवाडीमध्ये शौचालय बांधणेसाठी प्रत्येकी रुपये ५,०००/- प्रमाणे १० अंगणवाडीसाठी अनुदान पंचायत समितीकडून प्राप्त झाले आहेत.

ह्या प्राप्त अनुदानाचे अनुषंगाने सन २००६ – २००७ ते २००७ – २००८ लेखापरीक्षण वर्षात शौचालय बांधकामावर खर्च नोंदवला नसल्याचे आढळून आले. ह्या संदर्भात विचारणा केली असता लेखापरीक्षण मुदतीपर्यंत बांधकाम झालेले नसल्याचे सांगण्यात आले व ह्याबाबत दप्तरी कोणतेही कागदपत्र / नस्ती कार्यभार हस्तांतरणाचे वेळी दिलेले नसल्याचे सांगितले आहे.

तसेच ग्रामनिधीत दिनांक ९.१०.२००६ रोजी अनुदान रक्कम रुपये ५०,०००/- जमा झालेनंतर तात्कालिक ग्रामविकास अधिकारी यांनी ग्रामपंचायतीचा कार्यभार हस्तांतरण दिनांक ३१.१०.२००७ अखेर बँकेत रुपये १,६६०.७४ पैसे शिल्लक आढळून आली. म्हणजेच प्राप्त अनुदानाचा वापर शौचालय बांधकामासाठी न करता इतरत्र शिर्षाखाली खर्च करुन रक्कमेचा गैरव्यवहार केलेला आहे हे स्पष्ट होते.

ह्या अनियमिततेबाबत प्रशासकीय चौकशी होऊन प्राप्त अनुदान शासनास परत करणेसंदर्भात संबंधितांवर कार्यवाही होऊन तसे केल्याचे लेखापरीक्षणास दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक :- ३५ :- रोखवहीत व बँकेत पुरेशी रक्कम शिल्लक नसतांना धनादेश अनियमितपणे प्रदान करणे.**

ग्रामनिधीचे रोखवही व बँक पासबुकातील शिल्लक रक्कमेची पडताळणी केली असता दिनांक ३१.१०.२००७ रोजी नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँक, शाखा चांदवड यांचे खाते क्रमांक ४१ व ४४ मध्ये रुपये १,६६०.७४ पैसे शिल्लक (ग्रामनिधी व ग्रामीण पाणी पुरवठा निधीत रोखवहीसह) आढळून आली. तथापि तात्कालिन ग्रामविकास अधिकारी यांनी दिनांक ३१.१०.२००७ व ५.११.२००७ रोजी खालील नमुद तपशिलाप्रमाणे रोखवहीत व बँक खातेमध्ये पुरेशी शिल्लक नसतांना धनादेश संबंधितांना, ह्याबाबत रोखवहीत कोणत्याही नोंदी न घेता प्रदान केल्याचे आढळून आले.

| धनादेश क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|---|
| | | **ग्रामनिधी** | |
| ८४५३५० | ३१.१०.२००७ | ८,००० | अपना जनरल स्टोअर्स |
| ८४५४०१ | ५.११.२००७ | ३३,५०० | हेमंत वासूदेव तरटे |

| | | | |
|---|---|---|---|
| ८४५४०२ | ५.११.२००७ | १४,५०० | संतोष शिवाजी देशमुख |
| ८४५४०३ | ५.११.२००७ | ५,००० | महालक्ष्मी जनरल स्टोअर्स |
| ८४५४०४ | ५.११.२००७ | ३,००० | विलास वाघ |
| ८४५४०५ | ५.११.२००७ | १५,००० | धनेश्वर तुकाराम भालेराव |
| ८४५४०६ | ५.११.२००७ | १६,००० | धनेश्वर तुकाराम भालेराव |
| | **एकूण** | ९५,००० | |
| **ग्रामीण पाणी पुरवठा निधी** | | | |
| ७७७४३३ | २.१.२००८ | ५०,२४१ | आनंद हार्डवेअर |
| ७७७४३५ | १७.११.२००७ | १०,००० | एम. आर. कापसे |
| | **एकूण** | ६०,२४१ | |

उपरोक्त नमुद धनादेश संबंधितांना परस्पर कोणतेही प्रमाणके, पावती व योग्य तो तपशिल न घेता देऊन ग्रामनिधीच्या ह्या खात्यामध्ये जसजशी रक्कम जमा होईल त्या वेळेस परस्पर धनादेश वटवण्यात आला आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| धनादेश क्रमांक | वटवल्याचा दिनांक | बँकेत शिल्लक रक्कम | धनादेशाची रक्कम |
|---|---|---|---|
| **ग्रामनिधी** | | | |
| ८४५३५० | ८.११.२००७ | ८,१६५ | ८,००० |
| ८४५४०४ | २१.११.२००७ | ३६,१०८ | ५,००० |
| ८४५४०३ | २१.११.२००७ | | ३,००० |
| ८४५४०१ | २३.११.२००७ | ४१,९५८ | ३३,५०० |
| ८४५४०२ | २७.११.२००७ | १५,७१८ | १४,५०० |
| ८४५४०५ | ३०.११.२००७ | ३२,६३७ | १५,००० |
| ८४५४०६ | ५.१२.२००७ | ६७,३२५ | १६,००० |
| **पाणी पुरवठा** | | | |
| ७७७४३३ | २.१.२००८ | २०,८०९ | ५०,२४१ |
| ७७७४३५ | १७.११.२००७ | ४,२६३ | १०,००० |

ह्या अनियमिततेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१. नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँक, शाखा चांदवड यांचे खाते क्रमांक ४१, ४४ मध्ये पुरेशी शिल्लक नसतांना उपरोक्त नमुद धनादेश कोणत्याही कागदपत्राअभावी व मा. सरपंच यांचेशी विचार विनिमय न करता, मासिक सभेस ह्याची पूर्ण कल्पना देऊन

झालेला खर्च बरोबर असलेबाबत विषय न मांडता कोणत्याही मंजूरी विना देणे हे अनियमित व बेकायदेशीर आहे.

२. ज्या दिवशी संबंधितांना धनादेश दिला त्या तारखांदरम्यान तात्कालीन ग्रामविकास अधिकारी यांची पदोन्नतीने बदली इतरत्र झालेली होती व ते त्या तारखांदरम्यान पदोन्नतीच्या ठिकाणी हजर झालेले होते. त्यामुळे उपरोक्त धनादेश संबंधितांना त्यांचे स्वाक्षरीने देणे हे नियमबाह्य व अनियमित आहे.

३. सदरचे धनादेश संबंधितांना दिल्याचे पंचायतीच्या कोणत्याही पदाधिकारी व बदली होऊन आलेल्या ग्रामविकास अधिकारी यांना पूर्ण कल्पना नसावी याचे महत्त्वाचे कारण (दप्तराचा पूर्ण कार्यभार न दिल्याने) नव्याने नियुक्तीवर आलेले ग्रामविकास अधिकारी यांच्या स्वाक्षरीने नमुने बँकेकडे दिलेले नव्हते. फक्त रोजचा वसूल बँकेत ह्या दरम्यान भरणा व्हायचा व ज्या दिवशी पुरेशी शिल्लक बँकेत असायची त्यादिवशी धनादेश वर नमुद तपशिलाप्रमाणे वटवला जायचा ही संपूर्ण कार्यवाही बघता रुपये ९५,०००/- व ६०,२४१/- चा तात्कालीन ग्रामविकास अधिकारी यांनी संगनमताने अपहार केल्याचे स्पष्ट होते.

४. उपरोक्त नमुद धनादेशाद्वारे दिलेल्या रक्कमांसंदर्भात लेखापरीक्षण मुदतीपर्यंत प्रमाणके उपलब्ध नाही, ह्या खर्चास मासिक सभेत मान्यता घेतलेली नाही. तसेच ज्यांना धनादेशाद्वारे रक्कमा प्रदान झालेले आहे. त्यांनी ग्रामपंचातयतीस कोणत्या स्वरुपात सेवा काम दिले ह्याबाबत कागदपत्राअभावी पडताळणी करता आली नाही.

५. ह्या अनियमिततेबाबत प्रशासकीय चौकशी होऊन संबंधितांवर नियमबाह्य केलेल्या कृतीबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

उपरोक्त अभिप्रायांची पुर्तता होऊन खर्च रक्कम रुपये ९५,०००/- + ६०,२४१/- = १,१५,२४१/- रक्कमेबाबत जबाबदारी निश्चित करुन ह्या कायम स्वरुपी अपहारीत रक्कमेची वसूली सव्याज करुन ग्रामनिधीत जमा करावीत.

---

**परिच्छेद क्रमांक :- ३६ :- हायड्रोक्लोरीक ट्रॉली खरेदीपोटी अग्रीम रक्कम प्रदान**

पंचायतीने प्रमाणक क्रमांक १२५ दिनांक ३०.८.२००६ अन्वये रुपये ३०,०००/- सुनिल इंजिनिअर वर्क्स, दुगांव यांना हायड्रोक्लोरीक ट्रॉली खरेदी रक्कम रुपये ८५,७५०/- पोटी अग्रीम रक्कम प्रदान केली आहे.

ह्या अग्रीम रक्कम प्रदान केलेनंतर लेखापरीक्षण मुदतीपर्यंत संबंधितांनी ट्रॉली ग्रामपंचायतीस पुरविली नसून दिलेला अग्रीमाची रक्कम ही परत केली नाही. तसेच ह्यासाठी ग्रामपंचायतीने संबंधितांकडे रक्कम वसूलीबाबत कोणताही पाठपुरावा केलेला नाही. त्यामुळे प्रदान अग्रीम रक्कमेचा कायमस्वरुपी अपहार झाल्याचे स्पष्ट होते.

ह्या व्यवहाराबाबत प्रशासकीय चौकशी होऊन प्रदान अग्रीम रक्कम रुपये ३०,०००/- संबंधितांकडून सव्याज वसूल करुन ग्रामनिधीत जमा केल्याबाबत कार्यवाही करावी.

---

**परिच्छेद क्रमांक :- ३७ :- सतरंजी खरेदीपोटी अग्रीम प्रदान**

पंचायतीने प्रमाणक क्रमांक ३३८ दिनांक ३०.३.२००७ रक्कम रुपये ४,०००/- सतरंजी खरेदीपोटी मे. रास भाटीया यांना अग्रीम प्रदान केली आहे.

लेखापरीक्षण मुदतीपर्यंत सतरंजी प्राप्त नाही अथवा अग्रीम रक्कम वसूल केलेली नाही. त्यामुळे प्रदान रक्कमेचा कायमस्वरुपी अपहार झाला आहे हे स्पष्ट होते. अपहारीत रक्कम रुपये ४,०००/- संबंधितांकडून सव्याज वसूल करुन ग्रामनिधीत जमा केल्याचे खात्री पटवावी.

---

## महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखा परीक्षा १९६१ चे नियम १७ (ड) खालील अनियमितता

---

**परिच्छेद क्रमांक :- ३८ :- जिल्हा ग्रामविकास निधी वर्गणीबाबत**

ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ११३ नुसार पंचायतीने मागील वर्षाच्या निव्वळ उत्पन्नाच्या ५% जि.ग्रा.वि.नि. वर्गणी भरणा केलेली आहे. सुधारीत महाराष्ट्र शासन राजपत्र मुंबई ग्रामपंचायत अधिनियम (अर्थसंकल्प व लेखा) (सुधारीत) नियम दिनांक ५ जून २००४ नुसार सन २००५ – २००६ पासून निव्वळ उत्पन्नाच्या ०.२५% भरणा करावयाची आहे. लेखापरीक्षा मुदतीत खालीलप्रमाणे वर्गणी रुपये २०,९४६/- कमी भरणा केलेली आहे. कमी भरणा केलेली रक्कम आता त्वरीत भरणा करावी / जादा भरणा केलेल्या वर्गणीचे पुढील देय वर्गणीत समायोजन करावे.

| वर्गणी वर्ष | आकारणी पात्र उत्पन्न | वर्षे | ०.२५% भरणा करावयाची वर्गणी रुपये | भरणा केलेली वर्गणी रुपये | कमी भरणा रक्कम रुपये | जादा भरणा रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ०४ – ०५ | ३२२६२३९ | ०५ – ०६ | ८०६० | - | ८,०६० | |
| ५० – ०६ | २६८२८३३ | ०६ – ०७ | ६७०७ | - | ६,७०७ | |
| ०६ – ०७ | २४७१४८८ | ०७ – ०८ | ६१७९ | - | ६,१७९ | |
| | | | | एकूण | २०,९४६ | |

---

**परिच्छेद क्रमांक :- ३९ :- महिला व बालकल्याण करिता करावयाच्या खर्चाबाबत**

महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. झेड.पी.ए. – १०९४/सी.आर./९६६/७५ दिनांक १३.८.१९९४ अन्वये ग्रामपंचायतींना मिळणा-या शेतसारा अनुदान, उपकर अनुदान, समीकरण अनुदान व मुद्रांक शुल्क या अनुदानातून महिला व बालकल्याण संबंधित कार्यक्रमावर सन १९९४ – १९९५ पासून १०% इतपत खर्च करणे बंधनकारक आहे. ग्रामपंचायतीने खालीलप्रमाणे कमी / जास्त खर्च केला आहे. सदरचा उर्वरित अनुशेष रुपये ७५,८८६/- भरुन काढावा.

| वर्ष | प्राप्त अनुदान | अभिप्रेत खर्च | झालेला खर्च | कमी खर्च | जादा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| | मागील लेखा परीक्षण अहवालाप्रमाणे - | | | २८,९१२ | |
| ०५ – ०६ | १,९९,५१६ | १९,९५२ | - | १,९९,९५२ | - |
| ०६ – ०७ | २,०७,८४२ | २०,७८४ | - | २०,७८४ | - |
| ०७ – ०८ | ६२,३७९ | ६,२३८ | - | ६,२३८ | - |
| | | | एकूण | ७५,८८६ | - |

---

**परिच्छेद क्रमांक :- ४० :- मागासवर्गीय सदरी कमी खर्च केल्याबाबत**

लेखापरीक्षण कालावधीत खालीलप्रमाणे मागासवर्गीय यांच्या सदरी कमी खर्च करणेत आला आहे. शासन निर्णय क्र. ग्रामविकास विभाग ग्रामपंचायत प्र.१०९०/ प्र.क्र./१६१२/२१अ/दिनांक २५.१०.१९९० (सचिव १७४६ दिनांक १.११.१९९०) अन्वये

पंचायतीने १५% व सुधारीत शासन निर्णय क्रमांक १०९३/प्र.क्र./१२३९/३४ दिनांक १.१.१९९३ अन्वये १९९४ – १९९५ पासून निव्वळ उत्पन्नाच्या २०% इतका खर्च मागासवर्गीय यांच्या उन्नतीसाठी करणे आवश्यक आहे. परंतु या सदरी खालीलप्रमाणे कमी खर्च का करणेत आला याचा खुलासा करावा. कमी खर्च केल्यामुळे संभाव्य अनुदान पंचायतीस देतांना प्रमाणित कपात झाल्यास त्यास पंचायत पदाधिकारी जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी. कमी केलेल्या खर्चाचा अनुशेष पंचायतीने भरुन काढावा. तसेच जादा झालेल्या खर्चाचे पुढील वर्षात समायोजन करण्यात यावे.

| वर्षे | निव्वळ उत्पन्न रुपये | पंचायतीने करावयाचा खर्च | पंचायतीने केलेला खर्च | कमी केलेला खर्च | जादा केलेला खर्च |
|---|---|---|---|---|---|
| | मागील लेखा परीक्षण अहवालाप्रमाणे - | | | ९५,८४२ | - |
| ०५ – ०६ | २६,८२,८३३ | ५,३६,५६७ | - | ५,३६,५६७ | - |
| ०६ – ०७ | २४,७१,४८८ | ४,९४,२९८ | - | ४,९४,२९८ | - |
| ०७ – ०८ | २९,५७,५५५ | ५,९१,५११ | - | ५,९१,५११ | - |
| | | | **एकूण** | **१७,१८,२१८** | - |

---

**<u>परिच्छेद क्रमांक :- ४१ :- ३५% अनुदान जवाहर रोजगार योजना / पाणीपुरवठा खात्याकडे वर्ग न केलेबाबत.</u>**

महाराष्ट्र शासन ग्रामविकास निधी शासन निर्णय क्र. व्ही.पी.जी. १०८९/ प्र.क्र./३०२२/२२ दिनांक २४.१०.१९८९ अन्वये महाराष्ट्र ग्रामपंचायत १९५८ चे कलम १३२ ब नुसार पंचायतीने पंचायतीस मिळालेल्या शेतसारा अनुदानाच्या ३५% रक्कम सन १९९६ – १९९७ पर्यंत जवाहर रोजगार योजना निधीकडे, तर सुधारीत शासन निर्णय मुंबई ग्रामपंचायत सुधारणा अधिनियम १९९६ अन्वये महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण भाग – ४ मध्ये दिनांक २.१.१९९९ अन्वये प्रसिध्द झालेप्रमाणे सन १९९७ – १९९८ पासून मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १३१(१) अन्वये शेतसारा अनुदानाच्या ३५% रक्कम जवाहर रोजगार योजनेकडे वर्ग करणेत यावी तसेच रक्कम रुपये २३,७५३/- पाणी पुरवठाकडे वर्ग करणेत यावेत. जादा झालेल्या खर्चाचे पुढील आर्थिक वर्षात समायोजन करण्यात यावे.

| वर्षे | शेतसारा अनुदान | ३५ % वर्ग करावयाची रक्कम | वर्ग केलेली रक्कम | कमी वर्ग केलेली रक्कम | जादा वर्ग केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| | मागील लेखा परीक्षण अहवालाप्रमाणे - | | | - | - |
| ०५ – ०६ | ३९,९७२ | १३,९९० | - | १३,९९० | - |
| ०६ – ०७ | ९,८१२ | ३,४३४ | - | ३,४३४ | - |
| ०७ – ०८ | ६,३२९ | ६,३२९ | - | ६,३२९ | - |
| | | | एकूण | २३,७५३ | - |

---

**परिच्छेद क्रमांक :- ४२ :- कर्मचारी सेवा पुस्तकांबाबत.**

पंचायतीच्या कर्मचा-यांचे सेवापुस्तकांची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे त्रुटी आढळून आल्या.

१. वैद्यकीय प्रमाणपत्र नोकरीत काम करण्यास सक्षम असल्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र कोणत्याही कर्मचा-यांचे घेतलेले नाही, नोंद नाही.

२. कर्मचा-यांचे सेवापुस्तकात कुठलीही अद्यावत नोंद नाही.

३. वार्षिक वेतन वाढीच्या नोंदी घेतलेल्या नाही.

४. सेवापुस्तक हा कर्मचा-यांच्या सेवेचा आरसा आहे. ज्यावर निवृत्ती, उपदान, रजा इत्यादी देय राहते. ते कशाच्या आधारे प्रदान करण्यात येते?

५. कर्मचा-यांच्या अर्जित / परावर्तीत रजांचा हिशोब नाही. रजा कशाचे आधारे मंजूर केल्या जातात?

वरील त्रुटींची पुर्तता करण्यात यावी व सेवा पुस्तकांतील नोंदी अद्यावत ठेवण्यात याव्यात.

---

**परिच्छेद क्रमांक :- ४३ :- वसूल रक्कमा बँकेत जमा न करता परस्पर खर्चाबाबत.**

मुंबई ग्रामपंचायत (ग्रामनिधीचे अभिरक्षा व गुंतवणुक) नियम १९६१ चे कलम १७६(४) अन्वये वसूल रक्कमा प्रथम बँकेत जमा करुन नंतर धनादेशाद्वारे व्यवहार करणे आवश्यक आहे. परंतु पंचायतीने ग्रामनिधी व पाणी पुरवठा मध्ये ब-याच वसूल रक्कमा बँकेत जमा न करता परस्पर खर्च केलेला आहे. हाती शिल्लक मोठी असल्यामुळे गैरव्यवहार शक्य आहे. सदरच्या अनियमिततेबाबत साधार खुलासा करावा व यापुढे अशा प्रकारे व्यवहार न करणेबाबत दक्षता घेणेत यावी.

**परिच्छेद क्रमांक :- ४४ :- सरपंच मानधन अनुदानाबाबत.**

महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय व्ही.पी.एम./२६०९/प्र.क्र./२०६/२/२१ मुंबई – ३२ दिनांक २१.१.२००० अन्वये जानेवारी २००० पासून सरपंच यांना मानधन देय असून रुपये १०,०००/- व आतील निव्वळ उत्पन्नासाठी १००% व रुपये १०,०००/- ते रुपये ३०,०००/- उत्पन्नाचे पंचायतीसाठी व वरील उत्पन्नासाठी ५०% अनुदान देय आहे. मानधन प्रदान करणेत आले आहे. तथापि सदर प्रदानाची नोंद नमुना नंबर ११ ला घेण्यात येऊन अनुदानाची मागणी नोंदविलेली नाही. प्राप्त अनुदानाच्या नोंदी घेऊन येणे अनुदान काढलेले नाही तरी नोंद अद्यावत घेऊन दिनांक ३१.३.२००८ अखेर मानधन प्रदान येणे प्राप्त अनुदान व येणे मानधन मागणी करणेत यावी व पुर्तता करावी. प्राप्त अनुदानाचे दाखले व प्राप्त अनुदानाचा तपशिल स्पष्ट नसल्याने येणे अनुदान लेखापरीक्षणात निश्चित करता आले नाही.

---

**परिच्छेद क्रमांक :- ४५ :- शौचालय अनुदानाबाबत.**

लेखापरीक्षण सन २००७ – २००८ मध्ये ग्रामपंचायतीस दिनांक ११.२.२००८ रोजी रक्कम रुपये २,४०,०००/- शौचालय अनुदान प्राप्त झाले आहे. गावातील लोकांना शौचालय बांधणेस प्रोत्साहन देणेसाठी जिल्हा परिषदेने अनुदान दिलेले असून लेखापरीक्षण वर्षाअखेर सदरचे अनुदान अखर्चित आहे.

जिल्हा परिषदेच्या आदेशानुसार प्राप्त अनुदानासंदर्भात योग्य ती कार्यवाही करावी व तसे केल्याचे लेखापरीक्षणांत खात्री पटवावी.

---

**परिच्छेद क्रमांक :- ४६ :- ग्रामपंचायत आर्थिक व्यवहाराबाबत चौकशी**

जिल्हा परिषद, नाशिक कार्यालयाचे पत्र साप्रवि / ग्रास/२९/८/दिनांक २९.१.२००८ व गटविकास अधिकारी, पंचायत समिती, चांदवड यांचे कार्यालयाचे पत्र पंसचां/ग्रापं/६९१/७/दिनांक १७.१२.२००७ अन्वये ग्रामपंचायत चांदवड येथील आर्थिक गैरव्यवहाराबाबत लेखापरीक्षण करणेबाबत कळविले होते.

ह्या अनियमिततेच्या अनुषंगाने जिल्हा परिषद, नाशिक व गटविकास अधिकारी, पंचायत समिती, चांदवड यांचे कार्यालयाने चौकशी केली असल्याबाबतच्या चौकशी अहवाल प्राप्त होणेसाठी या कार्यालयाचे पत्र क्रमांक स्था. १८/ब/ग्रापं/लेप/ नाशिक/११७२ दिनांक ७.७.२००८ अन्वये कळवूनही चौकशी अहवाल अथवा ह्या संदर्भात

कोणत्याही प्रकारचे उत्तर प्राप्त झालेले नाही. ह्याबाबत चौकशी अहवाल प्राप्त करुन लेखापरीक्षणांस सादर करावा.

---

**परिच्छेद क्रमांक :- ४७ :- वर्गीकरण नोंदवहीबाबत.**

ग्रामनिधी व पाणी पुरवठा विभागाचे वर्गीकरण नोंदवही सन २००५ – २००६ ते २००७ – २००८ ची वेळोवेळी नाही. त्यामुळे वार्षिक जमा खर्च तक्ता प्रत्यक्ष तयार केला तेव्हा त्यात खालीलप्रमाणे तफावत आढळून आली.

| सन | जमा | खर्च | तफावत |
|---|---|---|---|
| **ग्रामनिधी** | | | |
| २००५ – २००६ | ३९,७९,०४६ | २८,१२,६३५ | ११,६६,४११ |
| २००६ – २००७ | ४४,२८,८०६ | ४५,७५,६२२ | १,४६,८३१ |
| २००७ – २००८ | ३४,६६,८५४ | ३३,७५,८६० | ४४,९९३ |
| **पाणी पुरवठा** | | | |
| २००५ – २००६ | ७,०४,३६९ | ६,९६,२९४ | ८,०६५ |
| २००६ – २००७ | १२,६६,३७८ | ११,९८,३९५ | ६७,९८३ |
| २००७ – २००८ | ६,४४,८४३ | ७,१०,३७३ | ६५,५३० |

(विवरणपत्र क्रमांक २ पहा)

ह्या तफावतीबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.

१. उपरोक्त नमुद तफावतीबाबत मेळ घेऊन जमा व खर्च प्रमाणित व योग्य झालेबाबत खात्री पटवावी.

२. रोखवहीत व बँक पासबुकातील शिल्लक रक्कमेत लेखापरीक्षण वर्षात मेळ घेतलेला नसलेमुळे तफावत आढळून आली. तसेच ब-याच ठिकाणी ह्या रोखवही व बँक रक्कमांसंदर्भात फरकाचे अनुषंगाने मोघम स्वरुपी रक्कमा जमा व खर्च दाखवून नियमबाह्यरित्या मेळ घेण्याचा प्रयत्न केला आहे. उदाहरणार्थ – ग्रामनिधीत दिनांक १२.७.२००६ व २१.११.२००६ रोजी अनुक्रमे रुपये ३५,०००/- व ५,१००/- बँकेत भरणा दाखवून मेळ घेण्याचा प्रयत्न केला आहे. ह्या अनियमिततेमुळे ही उपरोक्त नमुद तफावत दिसून येत आहे.

उपरोक्त अभिप्रायाचे अनुषंगाने योग्य तो मेळ घेऊन जमा व खर्च योग्य असलेबाबत खात्री पटवावी.

**परिच्छेद क्रमांक :- ४८ :- जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत बांधलेल्या गाळेसंदर्भात करावयाच्या आकारणीबाबत.**

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नाशिक यांचेकडून चांदवड शहरात ५ गाळे बांधण्यात आले असून सदरचे गाळे व्यवसाय करणेसाठी लोकांना दिलेली आहे. गाळा बांधकामासाठी झालेल्या एकूण खर्चाच्या वार्षिक ५% दराने अंदाजे भाडे धरुन आर्थिक नुकसान निश्चित करावे.

तथापि ह्या गाळ्यातील व्यावसायिकांकडून ग्रामपंचायत दरमहा एकही पैसा वसूल करता नाही. ह्या संदर्भात संबंधित विभागाने गाळे बांधून हस्तांतरण केल्याच्या दिनांकापासून नव्याने आकारणी करावी व त्या संदर्भात योग्य तो ठराव करुन नमुना क्रमांक ११ ला नोंदी करुन थकबाकीसह रक्कमा ग्रामनिधीत जमा करणेची कार्यवाही करावी व तशी कार्यवाही केल्याबाबत लेखापरीक्षणांस अवगत करावे.

---

**परिच्छेद क्रमांक :- ४९ :- दुरध्वनी खर्चाबाबत**

लेखापरीक्षण वर्षात पंचायतीने सन २००५ – २००६ ते २००७ – २००८ मध्ये टेलिफोन बिले करणेकामी खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.

१. पंचायतीकडे टेलिफोन क्रमांक ०२५५६ / २५३८२० असे आहेत. सदर टेलिफोन व वर्गीकरणाला एकत्र नोंदविलेला आहे. त्यामुळे प्रत्येक टेलिफोनसाठी स्वतंत्रपणे किती खर्च झाला याचा बोध होत नाही.

२. सदरच्या टेलिफोन दुरध्वनी नोंद नोंदवह्या ठेवलेल्या नाहीत. त्यामुळे बाहेरगावी केलेले दुरध्वनी योग्य व पंचायतीच्या कामासाठी करणेत आले असलेची सत्यता पटत नाही. बाहेरगावी केलेले दुरध्वनी पंचायतीचे कामासाठी केल्याची खात्री करुन अनुपालन दाखवावे. सदरचे बिलामध्ये काही दुरध्वनी खाजगी कामासाठी केले असल्यास त्या दुरध्वनीची रक्कम संबंधितांकडून वसूल करण्यात यावी.

वरील अभिप्रायाबाबत साधार खुलासा करुन त्याप्रमाणे पुर्तता करावी.

---

**परिच्छेद क्रमांक :- ५० :- वाहन डिझेल व दुरुस्ती खर्चाबाबत.**

लेखापरीक्षण वर्षात पंचायतीने ट्रॅक्टरसाठी डिझेल व स्पेअर पार्ट व दुरुस्तीसाठी खालीलप्रमाणे वर्षवार खालीलप्रमाणे खर्च केलेला आहे.

| वर्ष | रक्कम रुपये | |
|---|---|---|
| २००५ – २००६ ते २००७ – २००८ | २,३९,९०४ | इंधन / डिझेल / ऑईल |
| - | - | दुरुस्ती |
| **एकूण** | २,३९,९०४ | |

१. पंचायतीने ट्रॅक्टरचे लॉगबुक ठेवण्यात आले नाही. पंचायतीने वेळोवेळी डिझेलसाठी खर्च केलेला आहे. परंतु प्रत्यक्ष खरेदी डिझेल मध्ये एकूण किती तास रनिंग झाले किती किलो मीटर याचा बोध होत नाही. त्यामुळे खरेदी केलेल्या डिझेलचा वापर योग्य झाला आहे किंवा नाही याची खात्री पटत नाही. तरी लॉगबुकातील नोंदी अद्यावत करुन अनुपालन दाखवावे.

२. पंचायतीने वाहन इतिहास (History sheet) नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे दुरुस्तीचे वेळी नवीन साहित्य टाकल्यानंतर जून्या साहित्याचा काय विनियोग झाला याचा तपशिल दप्तरी नाही.

वरील अभिप्रायाबाबत साधार खुलासा करुन त्याप्रमाणे पुर्तता करावी. तो पर्यंत सदरचा खर्च लेखापरीक्षणात आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

---

**परिच्छेद क्रमांक :- ५१ :- पाणी पुरवठा मोटार दुरुस्ती खर्चाबाबत**

लेखापरीक्षण मुदतीत खालीलप्रमाणे पाणी पुरवठा साहित्य म्हणजे विद्युत मोटार पुनर्बांधणी, सबमर्सिबल पंप दुरस्ती, पुनर्बांधणी व स्टार्टर दुरस्तीसाठी वारंवार खर्च केलेला आहे. सदर साहित्य नादुरुस्त झाल्याबाबत पाणी पुरवठा नोकराची लेखी नोटीस व गावक-यांचा पंचनामा करुन घेणेत आलेला नाही. तसेच सदर साहित्य दुरुस्तीपूर्वी कुशल कारागिराकडून योग्य काळाच्या हमीसह भावपत्रके मागवून दुरुस्ती करुन घेणेत आलेले नाही. त्यामुळे सदर खर्चाची सत्यता, योग्यता व अचुकता लेखापरीक्षणात पडताळून पाहता आली नाही. त्या अभावी सदरचा खर्च लेखापरीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

| वर्ष | प्र.क्र. | दिनांक | रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|---|---|
| **ग्रामनिधी** | | | | |
| २००५ – | २०८ | ३०.११.२००५ | २५,००० | संतोष इलेक्ट्रीकल्स |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २००६ | २९१ | २६.१२.२००५ | ३०,००० | संतोष इलेक्ट्रीकल्स |
| | ३५६ | ०२.०२.२००६ | ३६,००० | संतोष इलेक्ट्रीकल्स |
| २००६ – २००७ | ४५ | २२.०५.२००६ | ११,५२० | लक्ष्मी बोअरवेल |
| २००७ – २००८ | ४४ | ०८.०५.२००७ | २०,६१९ | महावीर ट्रेडर्स |
| **ग्रामीण पाणी पुरवठा निधी** | | | | |
| | ४४ | २०.१२.२००५ | १,७९५ | भवानी सबमर्सिबल मोटार दुरुस्ती |
| | ५ | ०८.०५.२००६ | १,१५० | भवानी सबमर्सिबल मोटार दुरुस्ती |
| | १४ | २४.०७.२००६ | ६०,००० | संतोष इलेक्ट्रीकल्स मोटार दुरुस्ती |
| | १७ | ०७.०८.२००६ | ५०,००० | संतोष इलेक्ट्रीकल्स मोटार दुरुस्ती |
| | २२ | २३.०९.२००६ | ३१,६६१ | ज्ञानेश्वर ट्रेडर्स १० एच.पी. इलेक्ट्रीकल मोटार |
| | ३८ | ०५.०२.२००८ | १०,५०० | इलेक्ट्रीकल मोटार दुरुस्ती |
| | ४३ | १५.०२.२००८ | १०,००० | इलेक्ट्रीकल मोटार दुरुस्ती |
| | | एकूण | २,८८,२४५ | |

---

**<u>परिच्छेद क्रमांक :- ५२ :- हातपंप / बोअर पंप / विद्युत पंप : वर्गणीबाबत</u>**

खालीलप्रमाणे लेखापरीक्षण कालावधीत हातपंप / बोअरपंप वर्गणी भरणे करिता अनुदानाच्या रक्कमेतून परस्पर कपात म्हणून रोकडवहीत खर्च नोंदविला आहे. मात्र सदर खर्चाची अधिकृत नमुन्यातील पावती दप्तरी पहावयास मिळाली नाही. तसेच गावात किती हातपंप / विद्युत पंप आहेत. तसेच वर्गणी ही कोणत्या हातपंपाची / विद्युत पंपाची व कोणत्या वर्षाची कपात केली याची खात्री करता येत नाही. किती हातपंप / विद्युत पंप सुस्थितीत आहेत त्यांची कोणत्या तारखांना दुरुस्ती केली याचा तपशिल दप्तरी नाही, त्या अभावी खर्चाची सत्यता, योग्यता व अचुकता लेखापरीक्षणात पडताळून पाहता आली नाही. सबब खालीलप्रमाणे झालेला खर्च लेखापरीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

| वर्ष | प्र.क्र. | दिनांक | रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|---|---|
| २००७ – २००८ | ४२ | १३.२.२००८ | १५,००० | हातपंप वर्गणी भरणा |
| | ४८ | १८.३.२००८ | १९,६३२ | हातपंप वर्गणी भरणा |
| | | **एकूण** | **३३,६३२** | |

---

**परिच्छेद क्रमांक :- ५३ :- १२ वा वित्त आयोग निधीबाबत.**

लेखापरीक्षणात ग्रामपंचातीने १२ वा वित्त आयोगाचे अनुदान प्राप्त असून ग्रामपंचायतीने स्वतंत्र लेखे ठेऊन खालीलप्रमाणे विकास कामे पूर्ण केलेली आहे.

**जमा खर्च तक्ता**

| जमा बाब | ०५ — ०६ | ०६ — ०७ | ०७ — ०८ | खर्चबाब | ०५ — ०६ | ०६ — ०७ | ०७ — ०८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अनुदान | १९११९२ | ५४११६१ | १६२५९४ | गटार क्रॉसिंग दुरुस्ती | - | २२४००० | - |
| व्याज | - | ५९०६.०५ | २००२.२४ | रस्ता दुरुस्ती काँक्रीट — १ | - | २६६००० | - |
| अनामत | - | - | ५७२८ | रस्ता दुरस्ती कॉंक्रीट — २ | - | २४०००० | - |
| | | | | अंतर्गत गटार | - | - | १९८७२८ |
| | | | | आरोग्य | - | ८००० | - |
| एकूण जमा | १९११९२ | ५४७३३७.०५ | २००३२४.२४ | एकूण खर्च | - | ७३८००० | १९९७२८ |
| सुरु. शिल्लक | - | १९११९२ | ५२९.०५ | अखेर शिल्लक | १९११९२ | ५२९.०५ | २१२५.२९ |
| **एकूण** | १९११९२ | ७३८५२९.०५ | २००८५३.२९ | **एकूण** | १९११९२ | ७३९५२९.०५ | २००९५३.२९ |
| | | | | | | ७३९५२९.०५ | |

| **अ. क्र.** | **कामाचे नाव** | **प्रशासकीय मंजूरी** | **तांत्रिक मंजूरी** | **प्राकलन** | **खर्च** | **मुल्यांकन** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गटार क्रॉसिंग दुरुस्ती | - | - | - | २,२४,००० | - |
| २ | रस्ता दुरुस्ती कॉंक्रीट — १ | - | - | - | २,६६,००० | - |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | रस्ता दुरस्ती कॉंक्रीट – २ | - | - | - | २,४०,००० | - |
| ४ | अंतर्गत गटार | ५८८/०७ १०.१०.२००७ | ७९९/ २९.१०.२००७ | १९२७०० | | |

वरील कामाबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहे.

१. बांधकामासाठी लागणारे साहित्य दरपत्रकाशिवाय खरेदी केलेले आहे.

२. काम क्रमांक १ ते ३ चे कामाबाबत प्रशासकीय मंजूरी, तांत्रिक मंजूरी, प्राकलन, मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणात उपलब्ध झाल्या नाही.

३. अ.क्र. ४ चे कामाचे रॉयल्टी रक्कम रुपये ११,१९९/- लेखापरीक्षणात कालावधीपर्यंत शासनास भरणा केलेले नाही. सदरची रक्कम शासन सदरी भरणा करावी.

४. काम क्रमांक ४ चे मुल्यांकन रुपये १,९९,७३१/- असून कामावर एकूण रुपये १,९८,७२८/- खर्च केलेला आहे. रॉयल्टी रक्कम रुपये ११,१९९/- सह केलेला आहे. एकूण रुपये १,९७,५२९/- खर्च करणे आवश्यक होते किंवा रॉयल्टीची रक्कम शासन सदरी भरण केल्याचे चलन लेखापरीक्षणात उपलब्ध नाही. वरीलप्रमाणे कार्यवाही व्हावी. अन्यथा मुल्यांकनापेक्षा जादा खर्च समजून रक्कम संबंधितांकडून वसूल करुन शासन सदरी भरणा केल्याचे अनुपालन पुढील लेखापरीक्षणात दाखवावे.

ह्या संदर्भात लेखापरीक्षण कालावधीत अर्धसमास पत्र क्रमांक २ दिनांक १७.६.२००८ रोजी देऊनही उपलबध होऊ शकली नाही. तरी उपरोक्त अभिप्रायाची पुर्तता करण्यात यावी. तो पावेतो खर्च लेखापरीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

---

**परिच्छेद क्रमांक :- ५४ :- यशवंत ग्रामसमृध्दी योजनांबाबत**

लेखापरीक्षणात ग्रामपंचायतीस यशवंत ग्रामसमृध्दी योजनेतून अनुदान प्राप्त असून ग्रामपंचायतीने स्वतंत्र लेखे ठेऊन खालीलप्रमाणे काम केलेली आहे.

**जमा खर्च तक्ता**

| जमा बाब | रुपये | खर्च बाब | रुपये |
|---|---|---|---|
| अनामत | ५०० | पंचायत समितीकडे भरणा | १,५०,००० |
| लोकवर्गणी | १,५०,००० | डांबरीकरण रस्ता | ४,८६,००० |
| अनुदान | ४,८६,००० | | |
| जमा | ६,३६,५०० | खर्च | ६,३६,००० |
| सुरुवातीची शिल्लक | - | अखेर | ५०० |

| | | | |
|---|---|---|---|
| **एकूण** | ६,३५,००० | **एकूण** | ६,३६,५०० |

१. सदर काम मक्तेदार जय मातादी कन्स्ट्रक्शन, चांदवड यांना ठेका पध्दतीने दिलेले आहे.
२. सदर कामाचे प्रशासकीय मंजूरी, तांत्रिक मंजूरी प्राकलन धावते मुल्यांकन लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.
३. सदर कामावर रुपये ४,८६,०००/- खर्च केलेला आहे व काम मार्च २००८ अखेर अपूर्ण आहे.
४. पंचायत समिती चांदवड / जा.क्र. वि/ग्रा.पं./आस्था/९२/०८ दिनांक २६.२.२००८ पत्राने ग्रामपंचायतीने रुपये ४,८६,०००/- चेक क्रमांक ६२८१२१ ने रक्कम अदा केलेली आहे. पण कामाचे धावते मुल्यांकन केलेले नाही. त्यामुळे रक्कमेचा अपहार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. या पत्राबाबत ग्रामपंचायतीची कार्यवाही लेखापरीक्षणात उपलब्ध नाही.
५. ग्रामपंचायतीने काम मक्तेदारास दिलेले आहे. पण प्रथम प्रमाणकात आयकर, विक्रीकर, रॉयल्टी, सुरक्षा अनामत, शासकीय कपाती केलेल्या नाही. याबाबत खुलासा करुन रक्कमा वसूली करुन योग्य त्या शिर्षाखाली भरणा केल्याचे अनुपालन पुढील लेखापरीक्षणात दाखवावे.

ह्या संदर्भात लेखापरीक्षण कालावधीत अर्धसमास पत्र क्रमांक १ दिनांक १८.६.२००८ ने मागणी करुनही कागदपत्र लेखापरीक्षणात उपलबध होऊ शकली नाही. उपरोक्त अभिप्रायांची पुर्तता करण्यात यावी तो पावेतो खर्च लेखापरीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

---

## महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखा परीक्षा १९६१ चे नियम १८(२) प्रमाणे दाखले

---

१. क प्रमाणे : लेखापरीक्षण मुदतीत पंचायतीने आपल्या महसूली तारणावर कर्ज घेतलेले नाही.
२. ड प्रमाणे : पंचायतीने राष्ट्रीय बचत पत्रात रक्कम गुंतवलेली नाही.
३. ग प्रमाणे : ज्या प्रयोजनासाठी अनुदान मिळाले आहे, त्यासाठी खर्च केलेला नाही.
४. घ प्रमाणे : अग्रिम व गुंतविलेल्या रक्कमा प्रतिभूत करण्यात आल्या नाहीत.
५. च प्रमाणे : पंचायतीने जि.ग्रा.वि. निधीतून कर्ज घेतलेले नाही. तसेच पंचायतीच्या महसूलातून मुद्दल व व्याज यांची परतफेड करण्यासंबंधी तरतुद करण्यात आलेली नाही.

६. छ प्रमाणे : पंचायतीने नवीन उपक्रम हाती घेतलेला नाही.

७. ज प्रमाणे : वार्षिक जमाखर्च तक्ता नमुना नंबर ३/४ तपासता व मेळ घेता बरोबर आढळला त्यावरुन ठेवलेले हिशोब यातील आक्षेप वगळता बरोबर असल्याचे आढळून आले.

८. झ प्रमाणे : एकंदरीत पंचायतीचे दप्तरी कामकाज असमाधानकारक आढळले. या अहवालातील दिलेल्या सूचनानुसार सुधारणा व्हावी. लेखापरीक्षणात सादर केलेल्या दप्तरावरुन हा अहवाल तयार केला आहे.

९. ट प्रमाणे : या अहवालासोबत खालीलप्रमाणे सहपत्रे जोडलेली आहेत.

१. पंचायतीस मिळालेल्या अनुदान रक्कमांचा तपशिल

२. जमा खर्चाचे संक्षिप्त विवरणपत्र

३. ग्रामीण पाणी पुरवठा तेरीजपत्रक

१०. ठ प्रमाणे : भाग – १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे बरेच परिच्छेद थकीत आहेत परिच्छेदांची पुर्तता करावी व अंतिम निर्णय प्राप्त करुन दाखविण्यात यावेत.

---

या अहवालासोबत घेतलेल्या आक्षेपांबाबत, पंचायतीचे दप्तरी कामकाजाबाबत पंचायतीचे ग्रामसेवक / सरपंच यांचेशी चर्चा केली आहे.

(शे. गो. देवळे)
जिल्हा ग्रामपंचायत लेखा परीक्षक, श्रेणी – २,
स्थानिक निधी लेखा, नाशिक

प्रत : माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर

१. मा. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद, नाशिक

२. मा. गटविकास अधिकारी, पंचायत समिती - चांदवड, जिल्हा – नाशिक

निर्गमित :

(शे. गो. देवळे)
जिल्हा ग्रामपंचायत लेखा परीक्षक, श्रेणी – २,
स्थानिक निधी लेखा, नाशिक

---

# विवरणपत्र क्रमांक – १

## ग्रामनिधी प्राप्त अनुदाने

| वर्ष | सामान्य पावती क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|---|---|
| २००५ – ०६ | १९७२ | १२.४.२००५ | १,७१३ | सहाय्यक अनुदान |
| | - | १४.९.२००५ | ९८,८६४ | गौण खनिज |
| | - | ७.१२.२००५ | ३,५११ | सहाय्यक अनुदान |
| | १४९३ | ६.१.२००६ | ३,९५० | महसूल |
| | १४९० | १३.२.२००६ | ६,००० | कर्मचारी अनुदान |
| | १४३ | २५.३.२००६ | २,४०,००० | दलित वस्ती |
| | ७ | ३१.३.२००६ | ३,२०,००० | दलित वस्ती |
| | ९ | ३१.३.२००६ | ११,९३१ | महसूल |
| | १८ | ३१.३.२००६ | ४४,६६९ | गौण खनिज |
| | १२ | ३१.३.२००६ | २२,३७८ | अनुदान |
| | १३ | ३१.३.२००६ | ७,५०० | अनुदान |
| | १४ | ३१.३.२००६ | ५,००० | अनुदान |
| | | **एकूण** | **७,६५,५१६** | |
| २००६ – ०७ | ४४ | १८.८.२००६ | ८०,००० | दलित वस्ती |
| | ४५ | १८.८.२००६ | ८०,००० | दलित वस्ती |
| | ७१ | ७.१२.२००६ | १,९८,०३० | मुद्रांक |
| | ७२ | ७.१२.२००६ | ७२० | सदस्य बैठक |
| | - | १०.७.२००६ | ५,३१२ | अनुदान तपशिल नाही. |
| | - | १०.७.२००६ | ४,५०० | अनुदान तपशिल नाही. |
| | - | १८.१२.२००६ | ३,२०,००० | दलित वस्ती |
| | - | २९.१.२००७ | १,८१,६२६ | स्थानिक विकास कार्यक्रम |
| | - | ९.१०.२००६ | ५०,००० | अंगणवाडी शौचालय प्रत्येकी रुपये ५,०००/- प्रमाणे |
| | - | २६.१०.२००६ | १,५२,२५५ | स्थानिक विकास कार्यक्रम |
| | | **एकूण** | **१०,७२,४४३** | |

## प्राप्त अनुदाने

| वर्ष | सामान्य पावती क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|---|---|
| २००७-०८ | - | १८.६.२००७ | ४,९२० | अनुदान तपशिल नाही |
| | - | १६.७.२००७ | २६,२७६ | गौण खनिज |
| | - | २.८.२००७ | ६,२६२ | गौण खनिज |
| | - | २.८.२००७ | ३,७३४ | गौण खनिज |
| | - | २.८.२००७ | १६,४७१ | गौण खनिज |
| | - | ११.१.२००८ | १,५५० | ग्रॅन्टइनड |
| | - | ११.२.२००८ | २,४०,००० | शौचालय अनुदान |
| | - | ११.२.२००८ | ३,१६६ | समानिकरण |
| | | **एकूण** | **३,०२,३७९** | |

(शे. गो. देवळे)
जिल्हा ग्रामपंचायत लेखा परीक्षक, श्रेणी – २,
स्थानिक निधी लेखा, नाशिक

## विवरणपत्र क्रमांक – २

### ग्रामपंचायत – चांदवड, तालुका – चांदवड, जिल्हा – नाशिक
### ग्रामनिधी संक्षिप्त जमा खर्च तक्ता सन २००५ – २००६ ते २००७ – २००८

| जमा बाब | २००५ – ०६ | २००६ – ०७ | २००७ – ०८ | खर्च बाब | २००५ – ०६ | २००६ – ०७ | २००७ – ०८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रत्यक्ष कर | १८,५६,१९०.०० | १३,२७,५३३.०० | १३,७८,४६९.०० | सर्वसाधारण | १४,७७,५६१.०० | २२,७९,०५२.०० | २८,१२,७६३.०० |
| अप्रत्यक्ष कर | ६,१९,५८५.०० | ६,७८,०००.०० | १०,५०,०००.०० | असाधारण | - | २०,८९,६५१.०० | - |
| मालमत्तेपासून | ७३,१५०.०० | १७,८००.०० | - | भांडवली | ३,४८,७२२.०० | - | - |
| अनुदाने | ७,६५,५१६.०० | १०,७२,४४३.०० | ३,०२,३७९.०० | अग्रीम/अनामत | १,०१,४७४.०० | - | १,१०,०००.०० |
| किरकोळ | १,३३,९१८.०० | ४,४८,१५५.०० | ५,२९,०८६.५० | किरकोळ | - | - | - |
| **एकूण जमा** | **३४,४८,३५९.००** | **३५,४३,९३१.००** | **३२,५९,९३४.५०** | **एकूण जमा** | **१९,२७,७५७.००** | **४३,६८,७०३.००** | **२९,२२,७३६.००** |
| **सुरुवातीची शिल्लक** | **५,३०,६८७.८४** | **८,८४,८७८.३४** | **२,०६,९१९.८४** | **सुरुवातीची शिल्लक** | **८,८४,८७८.३४** | **२,०६,९१९.८४** | **४,५३,०९७.८४** |
| **एकूण** | **३९,७९,०४६.८४** | **४४,२८,८०९.३४** | **३४६६८५४.३४** | **एकूण** | **२८,१२,६३५.३४** | **४५,७५,६२२.८४** | **३३,७५,८६०.८४** |
| **फरक** | **-** | **-** | **-** | **फरक** | **११,६६,४११.५०** | **१,४६,८३१.६६** | **४४९९३.५०** |

जिल्हा ग्रामपंचायत लेखा परीक्षक, श्रेणी – २,
स्थानिक निधी लेखा, नाशिक

**<u>ग्रामपंचायत – चांदवड, तालुका – चांदवड, जिल्हा – नाशिक</u>**

**<u>ग्रामनिधी संक्षिप्त जमा खर्च तक्ता सन २००५ – २००६ ते २००७ – २००८</u>**

| **जमा बाब** | **२००५ – ०६** | **२००६ – ०७** | **२००७ – ०८** | **खर्च बाब** | **२००५ – ०६** | **२००६ – ०७** | **२००७ – ०८** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पाणी पट्टी | ५,४५,९४५ | ३,९५,४४० | ४,३५,१८० | सर्वसाधारण | ४,०३,२९२ | ७,८१,३७८ | ५,९७,७५२ |
| नळ जोडणी फी | १,०५,३४५ | ९१,२१० | ९५,९६५ | स्थानिक विकास कार्यक्रम खर्च (आमदार निधी) | - | ३,११,२०० | - |
| अनामत | १,६९७ | - | ५,२८१ | | | | |
| आमदार निधी अनुदान | - | ४,८६,७२६ | - | | | | |
| किरकोळ | - | - | २,६०० | | | | |
| **एकूण जमा** | **६,५२,९८७** | **९,७३,३७६** | **५,३९,०२६** | **एकूण खर्च** | **४०,३२९** | **१०,९२,५७८** | **५,९७,७५२** |
| **सुरुवातीची शिल्लक** | **५१,३७२** | **२,९३,००२** | **१,०५,८१७** | **अखेर शिल्लक** | **२,९०,००२** | **१,०५,८१७** | **१,१२,६२१** |
| **एकूण** | **७,०४,३५९** | **१२,६६,३७८** | **६,४४,८४३** | **एकूण** | **७,०४,३५९** | **११,९८,३९५** | **७,१०,३७३** |
| **फरक** | | | | **फरक** | **८,०६५** | **६७,९८३** | **६५,५३०** |

(शे. गो. देवळे)
जिल्हा ग्रामपंचायत लेखा परीक्षक, श्रेणी – २,
स्थानिक निधी लेखा, नाशिक

## विवरणपत्र क्रमांक - ३

## दलितवस्ती सुधार योजना
## सन २००७ - २००८ जमा खर्च तक्ता

| जमा | रक्कम | खर्च | रक्कम |
|---|---|---|---|
| अनामत | १,००० | परिच्छेद क्रमांक २८ नुसार खर्च | २५,१४,००० |
| अनुदान | २५,२०,००० | | |
| एकूण जमा | २५,२०,००० | एकूण खर्च | २५,१४,००० |
| **सुरुवातीची शिल्लक** | - | **अखेर शिल्लक** | ७,००० |
| **एकूण** | २५,२१,००० | | २५,२१,००० |

(शे. गो. देवळे)
जिल्हा ग्रामपंचायत लेखा परीक्षक, श्रेणी – २,
स्थानिक निधी लेखा, नाशिक

**<u>परिच्छेद क्रमांक :- ४७ ब :- मालमत्ता नोंदवहीबाबत</u>**

पंचायतीचे स्थावर मालमत्ता नोंदवही (नमुना नंबर २५) व जमिनीचे नोंदणी पुस्तक (नमुना नंबर २७) ह्या नोंदवह्यांमध्ये अद्यावत नोंदी घेण्यात आलेल्या नसल्याने पंचायतीकडे हस्तांतरीत स्थावर मालमत्ता व पंचायतीने विविध निधीतून निर्माण स्थावर मालमत्ता किती आहे त्याचा विनियोग ज्या कामासाठी त्या निर्माण केल्या त्यासाठीच होतो किंवा कसे याबाबत खात्री करता आली नाही. तसेच नमुना नंबर २७ जमिनीची नोंदवहीमध्ये पंचायतीकडे असलेल्या जमिनीचा विनियोग कशा प्रकारे होतो, कोणत्या कामासाठी हस्तांतरीत केल्या किंवा कसे आजस्थितीत पंचायतीकडे शिल्लक नवीन क्षेत्र याबाबत ७/१२ खाते उतारे काढून जमिनी सुरक्षित पंचायतीच्याच ताब्यात असलेबाबतची सत्यता पडताळता आली नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, निर्णय क्र. जिपय/२०००/प्र.क्र./१५६/पंरास/०८ दिनांक २९.१.२००४ अन्वये जिप/पंस/ग्रापं/स्तरावरील मालमत्तेचे अभिलेखे अद्यावत ठेवणेबाबत आदेश आहेत. याबाबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी अद्यावत करुन घेऊन त्यांनी सदर अभिलेखे अद्यावत असल्याबाबत प्रमाणपत्र प्राप्त करुन पुर्तता करावी.